
# अज्ञात तपस्वी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
क्र. १२९३
१९६५



REFBK-0014433

सौ. प्रमिला कुळकर्णी

૩૯૮૮૬
તારીખ
૩.૩.૬૫
ગ્રં. ૨૧૧
૧૨૧૩

# अज्ञात तपस्वी

## पंडिता रमाबाई ह्यांच्या आईवडिलांचे जीवनचरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७९६६ दि: ५/१२/७१
क्रमांक ९२९३ नों. दि: ३.३.६५

लेखिका

सौ. प्रमिल वसंत कुलकर्णी
बी. ए. ऑनर्स

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ९१४३३

REFBK-0014433

नागपूर प्रकाशन
१९६४

मूल्य १ रुपया ५० पैसे

प्रकाशक :
दि. मा. घुमाळ,
नागपूर प्रकाशन,
सीताबर्डी, नागपूर-१

प्रकाशन क्र.-४१

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी,
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपुर १.

*ज्यांच्या आंतरिक जिव्हाळ्यातून व स्फूर्तिदायी सहकार्यातून मला क्षणाक्षणाला चैतन्य मिळत गेले ते माझे पती श्री.* **वसंतराव कुलकर्णी** *यांना ही वाङ्मयकृती सादर सप्रेम समर्पण.*

—सौ. प्रमिल

# मनोगत

" अज्ञात तपस्वी " म्हणजे पंडिता रमाबाई ह्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे होत. अनंतशास्त्री हे प्राचीन संस्कृत वाङ्मयाचे गाढ अभ्यासक. या वाङ्मयाच्या अभ्यासातून व चिंतनातून त्यांना स्त्रीसुधारणेची दिव्य दृष्टि मिळाली. स्त्रीजीवनाच्या तेजस्वितेचा अपूर्व साक्षात्कार त्यांना घडला. यामधून त्यांना नवी प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतून ते जे अलौकिक जीवन जगले त्याची ही कथा आहे.

अनंतशास्त्रींनी आपल्या पत्नीला—सौ. लक्ष्मीला—संस्कृत विद्या शिकवली व घरापासूनच त्यांनी स्त्री–शिक्षणाला सुरुवात केली. या ध्येया-पायी त्यांना अक्षरश: वनवास घडला. पण मनी धरलेले व्रीद्र त्यांनी सोडले नाही ! लक्ष्मीने प्रतिव्रतेप्रमाणे त्यांना प्रत्येक कार्यात अपूर्व अशी साथ दिली. संस्कृत विद्येमध्ये ती प्रवीण झाली. गुरुकुलातील विद्यार्थ्यांना ती शिकवू लागली. आपल्या मुलांना देखील विद्येचे घास तिनेच भरविले. आदर्श पत्नी व आदर्श माता हेच तिचे शुद्ध स्वरूप बनले.

पंडिता रमाबाई म्हणजे अनंतशास्त्री व लक्ष्मी यांची धाकटी सुकन्या. आज आपण त्यांना एक तेजस्विनी म्हणून ओळखतो. पण हे तेज ज्यातून निर्माण झाले, ती कूस किती उज्ज्वल होती ह्याची आपणास ओळख नाही. दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून होरपळून गेलेली रमा आईवडिलांच्या श्रेष्ठ संस्कारांमुळेच समर्थ बनली व पुढील विपत्तींना तोंड देऊ शकली हे सत्य आहे. पंडिता रमाबाईंना स्वत:ला देखील आपल्या मातापित्यांबद्दल केवढा आदर वाटत होता तो त्यांच्याच पुढे दिलेल्या शब्दांत व्यक्त होतो.

हंटर कमिशनपुढे साक्ष देतांना त्या आपल्या वडिलांसंबंधी म्हणतात—
" स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केल्याबद्दल ज्यांचा अतिशय छळ झाला, लोकांनी ज्यांच्या मार्गात अनेक अडचणी उपस्थित केल्या, लोकांनी ज्यांच्यावर बहिष्कार घातला, अशा गृहस्थाची मी कन्या असून स्त्रियांचा दर्जा वाढ-विण्यासाठी आजन्म कार्यमग्न व्हावे असा मी निश्चय केला आहे."

आणि आईविषयी लिहिताना त्यांची कृतज्ञता हळुवारपणे व्यक्त होते—" Whose sweet influence and able instruction have been the light and guide of my life."

अनंतशास्त्री व लक्ष्मी हे अज्ञातामध्ये राहिलेले महान तपस्वी होते. भारताच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात या तपस्वी पतिपत्नींचा उल्लेख गौरवाने केला जाईल यांत शंका नाही.

संसार करीत असताना समाजाकरिता काही थोडे करता आले तर करावे या नम्र भावनेने मी या तपस्व्यांची जीवनकथा लिहिली आहे. माझ्या दोन कन्यका–चि. अंजली व चि. वंदना–ह्यांना त्यांच्या कुमारवयात साध्या जीवनातील तेजस्विता समजावी व त्यांच्या मनावर सुसंस्कार व्हावेत याहि हेतूने हे पुस्तक मी लिहिले आहे.

माझ्या साऱ्या लेखनात माझे पती श्री. वसंतराव कुलकर्णी ह्यांनी निष्ठेने व तळमळीने मला अमोल मदत केली आहे, त्यावद्दल वाटणारी कृतज्ञता शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. नागपूर प्रकाशनाचे संचालक श्री. दि. मा. धुमाळ ह्यांनी खूप मेहनत घेऊन हे पुस्तक प्रकाशित केले यावद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. चित्रकार श्री. पाटणकर यांनी सुंदर चित्रे काढून दिली. मुद्रक श्री. पां. ना. बनहट्टी ह्यांनी सुंदर छपाई केली याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते.

कुमारवयांतील मुलामुलींना ही कथा आवडेल अशी आशा आहे.

**सौ. प्रमिल वसंत कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | सह्यगिरीच्या कुशीत | .... | १ |
| २. | सोनियाचा दिवस – अमृते पाहिला | .... | ५ |
| ३. | ग्रहण लागले संकल्पाला | .... | ७ |
| ४. | स्वप्नाला आशा फुटली | .... | १० |
| ५. | काळोखीला सुवर्णाचे पान | .... | १२ |
| ६. | वन्ही चेतला | .... | १६ |
| ७. | तेजाचे बळ | .... | २१ |
| ८. | तुफानामध्येच शांती | .... | २५ |
| ९. | जंगलातून मंगलाकडे | .... | २८ |
| १०. | अमरदीप | .... | ३२ |
| ११. | मानव करितो केवळ जगती घात मानवाचा | | ३५ |
| १२. | भंगली स्वप्ने – ओघळली अश्रूंची माला | | ३८ |
| १३. | अभंग श्रद्धा – अभंग श्रद्धास्थाने | .... | ४२ |
| १४. | आणि ती महायात्रा | .... | ४६ |
| १५. | विश्वकर्म्यांची दुर्दैवी बाळे | .... | ५१ |

# आमची नवीन प्रकाशने

## बाल वाङ्मय

| | |
|---|---|
| असे होते बापूजी | १–०० |
| पुत्र व्हावा ऐसा गुंडा | ०–७५ |
| शिरो | ०–७५ |
| मंगला | ०–७५ |
| सूर्यफुले | ०–७५ |
| कल्पनाकुमारी | ०–७५ |
| विजया दशमी | ०–७५ |
| ओली माती फिरते चाक | ०–७५ |
| सोहनपरी | १–०० |
| इटुकली मिटुकली गोष्ट | ०–७५ |
| उनाड राजा | १–५० |
| हंसिनी | १–०० |
| सुवर्णगंधा | १–०० |
| सिंदबादची एक सफर | ०–६२ |
| वनशोभा | ०–७५ |
| शिदोरी | ०–७५ |
| आवडत्या गोष्टी | ०–७५ |
| राजकन्या वैशालिनी | ०–६२ |
| पंचमहाल | ०–९० |
| पालापाचोळा | १–५० |
| अज्ञात तपस्वी | १–५० |
| राजा शिवाजी | १–५० |
| साहसी सारंगा | १–५० |
| कर्णफुले | १–०० |

## विनोदी नाटिका

| | |
|---|---|
| उपाशी राक्षस | १–०० |
| कोरा कागद | ०–५० |
| दोन आंधळे | ०–६२ |
| कपि संमेलन | ०–७५ |
| नवा चष्मा | ०–७५ |
| कल्याणचा खजिना | ०–५० |
| बराय मंडळी | ०–५० |
| धर्माचं पाप | ०–७० |
| पैशाला पाय फुटतात | ०–७५ |
| हेचि दान देगा | ०–७५ |
| एकाच माळेचे मणी | १–०० |
| लोककवि अनंतफंदी | ०–६२ |
| कुसुमची कारवाई | ०–६२ |
| स्वर्गावर स्वारी | ०–७५ |
| स्वराज्याचे तोरण | ०–६२ |
| झिम् झिम् | ०–६२ |

## नाटके

| | |
|---|---|
| प्रपंच करावा नेटका | २–५० |
| श्रीकृष्ण चरित्र रहस्य | २–५० |
| पहिला कवि | २–०० |
| आधुनिक मस्तानी | १–२५ |
| नव्या डाहाळ्या नवे खोपे | १–७५ |

**नागपूर प्रकाशन, सितावर्डी, नागपूर १.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३५०६६ वि: ४/२.२१
९२९३ नोंद दि: ३-३-६०

# अज्ञात तपस्वी

## १. सह्यगिरीच्या कुशीत

भारताची भूमी ही एक पवित्र तपोभूमी आहे. या तपोभूमीचे पावित्र्य रक्षणासाठी येथील मातीच्या कणाकणातून तेज प्रकट झाले आहे. या तपोभूमीला सुवर्णभूमीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी घाटाघाटातून महान साधक निर्माण झाले आहेत. सह्यगिरीने असे अनेक तपस्वी या भूमीवर वाहिले आहेत, की ज्यांच्या प्रकाशाने, सामर्थ्याने सारा देशच नव्हे, सारा दिगंत प्रकाशित झाला आहे.

सह्यगिरीचे काही एक आगळेच वैशिष्टच आहे. या घाटावरील हवा, पाणी आणि माती यांचे स्वरूपच काही वेगळे आहे. या सर्वांमध्ये विलक्षण तेज व चैतन्य भरलेले आहे. येथील हवेमध्ये असंतोष विरू शकत नाही. येथील पाण्यात असत्य विरघळू शकत नाही. आणि येथील मातीमध्ये अन्याय रुजू शकत नाही. त्यामुळे ज्या ज्या वेळी या भूमीवर असत्य, अन्याय भिरभिरत राहतो, त्यावेळी असे काही साधक जन्म घेतात की जे जन्मभर धडाडून पेटत राहतात, तडफडत राहतात आणि या भूमीचे सोने करण्यासाठी या दिव्य वेदीवर या जीवांची अखेर आहुतीच पडते.

अनंतशास्त्री डोंगरे ही एक अशीच अज्ञात आहुती होय.

हेच ते माळहेरंजी गाव. दक्षिण कर्नाटकात मंगळूर जिल्ह्यातील हे गाव. पश्चिम घाटाच्या कुशीत वसलेले हे सुंदरसे गाव. याच गावात बाळ अनंताचा जन्म झाला.

निसर्गाच्या मांडीवर बाळ अनंताचे बाळपण सुरू झाले. घाटाच्या माथ्यावरून हिंडावे, गर्द वनराईतून भटकावे, खोल खोल दऱ्यांमधून उड्या घेणारे ते फेसाळणारे अवखळ जलप्रवाह पहावे, या हूड निसर्गाशी अगदी मनसोक्त खेळावे, असे ते सुंदर बालपण संपू लागले.

आता अनंताला आजोबांची हाक ऐकू येऊ लागली. आणि तो आजोबांबरोबर नारळी पोफळी शिंपू लागला. नारळी पोफळी शिंपतां शिंपतां तो वेदांच्या ऋचा शिकूं लागला. वेदगंगेच्या या ओझरत्या दर्शनानेही बाल अनंताचे मन मोहित झाले. निसर्गाचे ते भव्य आणि उदात्त स्वरूप पाहून अनंताचे मन वेडावून गेले होते. पण वेदभांडारांतील ते अद्वितीय संपन्न स्वरूप पाहून त्यांच्या दृष्टीला आगळचा दिव्यत्वाचा साक्षात्कार होऊं लागला.

कालमानाप्रमाणे बाराव्या वर्षी अनंताचे लग्नही झाले. पण त्याचे मन संसारात रमले नाही. त्या डोंगरमाथ्यावर विसावले नाही. निसर्गाच्या कुशीत रममाण झाले नाही. दुरून कुठूनसा येणारा तो वेदगंगेचा अस्पष्टसा पण गंभीर ध्वनी त्याचे चित्त वेधून घेऊ लागला. मन उतावीळ झाले. त्या गंगेचे दर्शन घेण्यासाठी ओढ घेऊ लागले. ही ओढ अनिवार झाली आणि एके दिवशी अनंता घरातून पळून गेला.

होय ! अनंता पळून गेला. कुठे गेला ? कशासाठी गेला ? तो गेला थेट शृंगेरीच्या मठात श्रीमत शंकराचार्यांच्या पायाशी.

ज्ञानाचे व्रत घेतले त्याने ! आणि आचार्यांजवळ एकनिष्ठेने त्याचे अध्ययन सुरू झाले. अनंता हा आता अनंतशास्त्री बनू लागला.

अनंतशास्त्रींची बुद्धी तल्लख आणि चिकित्सक. त्यांनी वेदांचा अतिसूक्ष्मपणे आणि डोळसपणे अभ्यास सुरू केला. या अध्ययनातून, चिंतनातून त्यांना खरा धर्म दिसू लागला. ह्या धर्माचे स्वरूप मोठे उदात्त व विलोभनीय होते. हा धर्म त्यागावर अधिष्ठित होता. दया, क्षमा, शांती ही सर्वश्रेष्ठ मूल्ये त्याच्या प्रभावळीमध्ये चमकत होती. या धर्मामध्ये मानवाच्या सर्वांगीण प्रगतीची शक्ती दिसत होती.

या सर्वश्रेष्ठ धर्माच्या दर्शनामुळे अनंतशास्त्रींची दृष्टी विकसित झाली. या दृष्टीतूनच ते वेदकालीन रामायण महाभारतकालीन समाजस्थितीचा अभ्यास करू लागले. त्यात त्यांना कोणते दर्शन घडले ? या समाजात गार्गी, मैत्रेयी या महान विदुषी मोठ्या ज्ञानवंतांबरोबर वादविवाद करीत होत्या व समाज त्यांना 'स्त्री' म्हणून न हिणविता इतर ऋषीमुनींप्रमाणेच आदराने वागवीत होता. येथे सीता, सत्यभामेसारख्या बुद्धिमान सुसंस्कारी गृहिणी होत्या. सावित्री, द्रौपदीप्रमाणे अत्यंत चतुर व बुद्धिमान स्त्रियाही होत्या.

या समाजांतील स्त्री व पुरुष हे दोन्ही घटक उत्कर्षाच्या मार्गावरून वाटचाल करीत होती. अनंतशास्त्रींना या समाजस्थितीची ही स्वरूपे मोठी मनोवेधक वाटली. त्यांचे अध्ययन वाढले. त्याचबरोबर ज्ञानाची अतृप्तीही वाढली. त्यांची दृष्टी अधिक व्यापक बनली. अधिकच सखोल होऊ लागली. अशा सखोल अध्ययनातून घडलेले ते अपूर्व समाजदर्शन त्यांच्या मनाला



शांतता लाभू देईना. कारण तत्कालीन चालू समाजस्थितीचे स्वरूप त्यांना अत्यंत केविलवाणे दिसू लागले. त्यांच्या मनाची संतुष्टता नाहीशी झाली. अखेर अनंतशास्त्री शृंगेरीच्याही मठातून बाहेर पडले आणि ते पुण्याची वाट चालू लागले.

पुण्यामध्ये दुसऱ्या बाजीरावांचे गुरुजी रामचंद्रशास्त्री ह्यांच्या हाताखाली ते काम करू लागले, शागिर्दी करू लागले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासही करू लागले.

## २. सोनियाचा दिवस—अमृते पाहिला

अनंतशास्त्रींचे गुरुजी रामचंद्रशास्त्री हे पेशव्यांच्या वाड्यात अध्यापनाचे काम करीत. अनंतशास्त्री वाड्यात शागिर्दी करीत. असेच एके दिवशी ते काम करीत असताना त्यांच्या कानावर गोड व स्पष्ट श्लोक पडू लागले.

'गृहिणी सचिव: सखी मिथ:
प्रियशिष्या ललिते कलाविधौ ॥
करुणाविमुखेन मृत्युना
हरता त्वां वद किं न मे हृतम् ॥'

महाकवी कालिदासाच्या रघुवंशातील हा सुंदर श्लोक ! आणि इतक्या मधुरपणे कोण म्हणत होते ?

वाराणशीबाई म्हणत होत्या. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांची पत्नी !

अनंतशास्त्रींचा आपल्या कानावर विश्वासच बसेना. " मी स्वप्नात तर नाही ? इतक्या अस्खलितपणे एक स्त्री आणि संस्कृत श्लोक म्हणत आहे ? आश्चर्य !!"

पण ते स्वप्न नव्हते. ते सत्य होते.

अनंतशास्त्रींच्या डोळ्यासमोर नव्या व जुन्या विचारांचा संघर्ष सुरू झाला.

एका बाजूला अध्ययनातून दिसलेले ते दिव्य प्राचीन समाजदर्शन ! तर दुसऱ्या बाजूला तो वर्तमानकालीन रूढीग्रस्त समाज ! ............

हजारो वर्षांपूर्वीचा तो रूढीप्रिय समाज ओरडून सांगत होता.

स्त्री ही अमंगल आहे.

" स्त्री पापीण आहे.

स्त्रीचा जन्म अनंत जन्मांच्या महापातकातून होतो.

स्त्रीला देववाणीचा अधिकार नाही.

स्त्रीला देववाणी शिकवणे हे एक महापाप आहे. "

अनंतशास्त्रींचे भावपूर्ण मन उचंबळू लागले.

"माझ्या यमुनेला मी अमंगल, पापीण म्हणू ? "

त्यांची बुद्धि इतिहासाची पाने उलगडू लागली.

"गार्गी,, मैत्रेयी, अरुंधती या स्त्रिया अनंत जन्मांच्या पातकातून तयार होतील कशा ? "

"सीता, सावित्रीसारख्या देवतातुल्य स्त्रियांना देववाणीचा अधिकार नाही ? "

" द्रौपदी, कुंतीसारख्या तपस्विनींना देववाणी शिकवणे पाप ठरेल काय ? "

अनंतशास्त्रींच्या मनात ह्या दोन भिन्न दर्शनांमुळे संघर्ष चालू झाला. पण ह्या संघर्षातून त्यांच्या मनाला एक दिव्य साक्षात्कार दिसू लागला. त्यांच्या कानावर पुनःपुन्हा ती अमृतवाणी पडू लागली.

" गृहिणी सचिवः सखी मिथः........ "

अहाहा ! किती गोड ! किती पवित्र !

आणि पश्चिम घाटाच्या या वीराने एक शपथच घेतली. "मी माझ्या घरच्या सर्व बायकांना शिकवणार."

पश्चिम घाटावर जणू सोनियाचा दिवस आला.

## ३. ग्रहण लागले संकल्पाला

ज्ञानाच्या अनिवार ओढीने अनंतशास्त्रींना घराबाहेर ओढून नेले होते. त्या ज्ञानाच्या प्रकाशात न्हाऊन माखून तृप्त होऊन अनंतशास्त्री घराकडे परत आले. एका नव्याच आशेने त्यांनी घरामध्ये प्रवेश केला.

अनंतशास्त्रींची पत्नी यमुना ! सासूच्या हाताखाली काम-धाम करणारी. पतीदेवाला संतुष्ट ठेवून पदरी पुण्य जोडणारी. मुलाबाळांचे रात्रंदिवस कष्ट उपसणारी. बिचारी चारचौघीं-सारखीच संसार करणारी !

पण या यमुनेकडे अनंतशास्त्री वेगळ्याच दृष्टीने पाहू लागले. त्यांना वाटे यमुनेने वाराणशीबाईसारखे संस्कृत वाचावे आणि आपण कान तृप्त होईपर्यंत एकावे. यमुनेच्या स्वरूपात गार्गीमैत्रेयीचे नवे दर्शन घ्यावे.

एके दिवशी अनंतशास्त्री मोठ्या उमेदीने यमुनेला सांगू लागले, "हे बघ ! मी पुण्याला होतो तेव्हाची गोष्ट. पेशवे-वाड्यात मी रोज जात असे. तेथे बाजीराव पेशव्यांची पत्नी वाराणशीबाई संस्कृत शिकत असत. मी ऐकत होतो. वाराणशीबाई संस्कृत श्लोक म्हणत असत. आधीच बाईंचा गळा गोड. त्यातून रघुवंशासारखे मधुर काव्य ! मग काय हिराकांचन योगच !"

बिचारी यमुना ऐकत होती. तिरकस दृष्टीने आणि साशंक मनाने !! आणि अनंतशास्त्री मोठ्या उत्साहाने सांगतच होते. वाराणशीबाईंच्या शिक्षणाचे बहारदार वर्णन करून ते म्हणाले, " मला असं वाटत की सर्व बायकांनी संस्कृत शिकावे. तू शिकशील का ? मी शिकवेन तुला."

चटका बसल्याप्रमाणे यमुना दचकली. आणि म्हणाली, " बायकांना काय करायचं आहे शिकून ? आधीच आम्हा बायकांचा जन्म महापातकातून आलेला ! आता या जन्मी हे पाप कशासाठी करू ?"

अनंतशास्त्रींनी आश्चर्याने विचारले, " शिक्षण घेणे म्हणजे पाप होय ? पूर्वीच्या बायका काय शिकलेल्या नव्हत्या ? वेदकालातील स्त्रिया तर महापंडिता होत्या महापंडिता !"

यमुना म्हणाली, " मला काय करायचं आहे त्याच्याशी ? आजच्या या कलियुगात हे असले अभद्र अमंगळ काम कशाला करावं मी म्हणते !"

अनंतशास्त्रींनी विचारले, " शिक्षण घेणं म्हणजे अमंगळ, अभद्र होय ? "

यमुनेने निश्चयाने उत्तर दिले, " होय !"

अनंतशास्त्रींनी तिडीकेने विचारले, " बायका शिकल्या तर काय होते ? सांग, सांग पाहू ! "

यमुनेने कानावर हात ठेवले आणि म्हणाली, " बायका शिकल्या तर विधवा होतात. असलं काही करण्यापेक्षा मला आधीच मरण आलेलं बरं."

अनंतशास्त्रींचे मन एकदम चरकले. ते गप्प बसले. स्त्रीशिक्षणाबद्दल हा केवढा गैरसमज होता ! ह्याला शास्त्राचा किंवा इतिहासाचा आधार नव्हता. पण रूढीचा पाठिंबा होता. त्यांच्या संकल्पाला आता ग्रहणच लागले. ते फार विषण्ण झाले.

दिवसामागून दिवस जात होते. पण अनंतशास्त्रींच्या मनाची विषण्णता काहीशी होत नव्हती. त्यांच्या मनाचा कोंडमारा थांबत नव्हता. अस्वस्थता वाढतच होती.

एके दिवशी त्यांच्या आईवडिलांनी काशीयात्रेला जाण्याची इच्छा व्यक्त केली. आणि अनंतशास्त्रींची या सर्व कोंडमाऱ्यातून सुटका झाली. ते ताबडतोब सबंध कुटुंबाला घेऊनच निघाले.

काशीयात्रेला जात असतांना दुर्दैव त्यांच्याच मागोमाग जात होते. दुर्दैवाने यमुनेचे शब्द ऐकले होते आणि त्यानेच ते खरेही करून दाखवले. या यात्रेमध्ये वाटेतच यमुना अचानक मरण पावली.

अनंतशास्त्रींच्या मनाची निराशा वाढली. त्यांनी आपल्या आईवडिलांची यात्रा कशीबशी आटोपली व त्यांना सर्वांना त्यांनी परत घरी पाठवून दिले.

अनंतशास्त्री स्वत: एकटेच काशीक्षेत्रात राहिले. तेथेच ते अध्ययन करू लागले. तेथील अध्ययन संपवून ते तीर्थयात्रेला निघाले. नेपाळ, उत्तर हिंदुस्थानभर हिंडून ते दक्षिणेकडे आले. समाजाची अवनत परिस्थिति बघत ते पैठणला येऊन पोहोचले. तेथेच त्यांनी काही दिवस मुक्काम केला.

# ४. स्वप्नाला आशा फुटली

ते दिवसच मोठे आणिबाणीचे होते. पेशवाई संपली होती. देशात सर्वत्र धामधूम चालू होती. लुटालूट आणि जाळपोळीला ऊत आला होता. या लुटालुटीची धग वाईतील एका घराला लागली होती. माधवराव अभ्यंकर यांचे ते घर. मूळचे चांगले सुखवस्तू गृहस्थ. पण या लुटालुटीमध्ये व जाळपोळीमध्ये त्यांचे सर्वस्व गेले. माधवराव वैतागले. आयुष्याला कंटाळले व सहकुटुंब काशीयात्रेला निघाले. यावेळी त्यांच्याबरोबर त्यांची गरोदर पत्नी होती व दोन लहान मुली होत्या. एक नऊ वर्षाची व दुसरी सात वर्षाची. माधवराव अशा सांसारिक विपत्तीच्या काळात यात्रेला निघाले. यातच त्यांनी एक कडक व्रत सुरू केले. साष्टांग नमस्कार घालीत घालीत काशीयात्रा पूर्ण करावयाची असे व्रत त्यांनी धरले व या व्रताचे पालन करीत करीत ते पैठणपर्यंत येऊन पोहोचले. पण या अघोरी तपश्चर्येमुळे त्यांचे सबंध अंग सुजून गेले आणि अखेर त्यांना पैठणला मुक्काम करावा लागला.

एके दिवशी माधवराव गंगेवर आंघोळीस गेले. तेथे त्यांना एक नवीन तेजस्वी ब्राह्मण दिसला. त्यांनी चौकशी केली. तेव्हा त्यांना समजले की हे अनंतशास्त्री डोंगरे आहेत. मोठे विद्वान आणि श्रीमंत आहेत. पण विधुर आहेत. त्याबरोबर माधवरावांच्या मनात एक कल्पना चमकून गेली व त्यांनी अनंतशास्त्रींना आपल्या घरी बोलावले.

माधवरावांच्या घरी अनंतशास्त्री आले. माधवराव म्हणाले, "शास्त्रीबुवा, आपले तेज, विद्वता पाहून मला फार

३७९६८ दि. ११ ३-३-६५

समाधान वाटत आहे. माझ्या आयुष्यात वाईट दिवस आले आहेत. माझे होते ते सर्व लुटीस गेले. म्हणून जीवाला कंटाळून मी सहकुटुंब काशीस निघालो आहे. पण जीव सारखा धाकधुक होत आहे. माझ्या दोन मुली आहेत. सर्वांच्या जबाबदारीमुळे मी मेटाकुटीस आलो आहे. तेव्हा आपण मला एका बाबतीत मदत कराल का ? "

अनंतशास्त्रींनी विचारले, " कसली मदत ? "

माधवराव म्हणाले, " माझी इच्छा आहे....माझी थोरली मुलगी अंबा हिच्याशी आपण विवाह करावा. त्यात तिचे कल्याण होईल. आणि माझी एक मोठी जबाबदारी कमी होईल "

अनंतशास्त्रींनी चमकून अंबेकडे पाहिले मात्र ! नऊ वर्षांची कोवळी पोर होती ? अजाण, सुंदर, चुणचुणीत, हुशार ! अनंत-शास्त्रींचे स्वतःचे वय चव्वेचाळीस वर्षांचे ! हा विवाह कसा सुखदायी होणार ? अशी भीतीमय शंका त्यांच्या मनाला बोचली.

पण लागलीच त्यांच्या संकल्पाने वेगळीच साद दिली. 'लहान बायको असली तरी हरकत नाही. तिलाच शिक्षण देऊ आणि एक नवे तेजस्वी स्त्रीजीवन समाजापुढे उभे करू !"

अनंतशास्त्रींच्या मनाला हा साद पटला व त्यांनी चटकन् माधवरावांना होकार दिला. माधवरावांना स्वर्ग ठेंगणे झाले.

दुसरेच दिवशी मुहूर्त धरला गेला. कोवळ्या अंबेने अनंतशास्त्रींच्या गळ्यात हार घातला. अनंतशास्त्रींनी अंबेच्या गळ्यात हार घालून तिला 'लक्ष्मी' बनवले.

अनंतशास्त्री लक्ष्मीस घेऊन माळहेरंजीस आले.

# ५. काळोखीला सुवर्णाचे पान

एके दिवशी संध्याकाळी अनंतशास्त्री घरी आले. आई एकटीच होती. त्यांनी लक्ष्मीची चौकशी केली. तेव्हा आई म्हणाली, " ती गेलीय....पारावर....मोडक्या आडाजवळच्या " अनंतशास्त्रींनी काळजीच्या स्वरात विचारले, " त्या मोडक्या आडाजवळच्या ? तिथे कशासाठी ? "

आई नाखुषीनेच म्हणाली, " अरे आपला कुळाचार नाही का ? आडाजवळची भुतंखेतं....तो पारावरचा मुंजा....त्यांना संतुष्ट करायला हवं. म्हणून मीच पाठवली तिला पुजायला..... अशा करकरीत तिन्हीसांजेला...."

अनंतशास्त्री मनात तडफडू लागले. तो भयाण आड....तो एकाकी पार....सारे आठवून ते हैराण झाले. आणि आईवर रागावून बोलू लागले, " ती किती लहान आहे. तिला कशाला पाठवतेस त्या भयाण जागी ? "

आता मात्र आई संतापली. " तिला लहान म्हणतोस ? चांगली दहा वर्षांची वाढली आहे. तिनं नाही पूजा करायची तर कोणी करायची ? आपलेच कुळाचार आहेत. "

अनंतशास्त्री चिडून म्हणाले, " हे बघ ! पुन्हा तिला अशा वेळी तिकडे पाठवू नकोस. मला आवडत नाहीत या भूताखेतांच्या पूजा ! "

आईचा संताप शिगेस पोहोचला ! " चूप बैस ! अशा तिन्हीसांजी माझ्याशी भांडू नकोस. यावेळी घरात भांडणे झाली तर सारी भुते घरावर जमा होतील. ती माझी सून आहे. तिला मी सारे कुळाचार शिकवणार. तुला काय करायचे आहे ? "

अनंतशास्त्री वैतागून गेले, "मला या गोष्टी मुळीच पसंत नाहीत..... "

मायलेकरांचा वाद चालू असतांना लक्ष्मी घरात आली, आणि ते भांडण वरवर थांबले. लक्ष्मीला पाहून अनंतशास्त्रींच्या जीवात जीव आला. पण सासूने सुनेला पाहिले मात्र ! संतापाला उधान आले.....

मायलेकरांचे असे खटके वारंवार उडू लागले, आणि विचाऱ्या लक्ष्मीला सासूची जीवघेणी बोलणी वारंवार ऐकावी लागत. पण ती पोर मोठी धीराची आणि कमालीची सोशीक ! अनंतशास्त्रींना मात्र लक्ष्मीच्या रूपाने एक अमोल ठेवाच मिळाला असे वाटे. तिची आनंदी, उत्साही, सात्त्विक वृत्ति पाहून त्यांचे मन निर्वाळा देई, "येथे तुझे स्वप्न साकारणार आहे." आणि एके दिवशी त्यांचा संकल्प खरोखरच आशेने बहरून उठला.

त्याचे असे झाले ! एका रात्री अनंतशास्त्री लक्ष्मीशी बोलत होते, "सारी जुनाट कुळाचारे मी बंद केली म्हणून आई संतापत असते. आणि सारा राग तुझ्यावर काढते..... "

लक्ष्मीच्या मनाला या शब्दांनींच मोठा दिलासा वाटला. ती समाधानाने म्हणाली, "सासुबाईंचा कसला आलाय राग ? मांजरीचे दात कधी पिलांना बोचतात का ? त्या बोलतात. पण मनाने त्या फार प्रेमळ आहेत. आणि आपण एवढा दिलासा देता, मग मी कशाला त्रासून जाऊ ? "

अनंतशास्त्रींचे मन समाधानाने काठोकाठ भरून गेले. ते मोठ्या उत्साहाने म्हणाले, "लक्ष्मी, तुला एक गोष्ट सांगतो आज." लक्ष्मी लाजून हसली. आणि अनंतशास्त्री सांगू लागले,

" ऐक. मी वेदविद्या शिकण्यासाठी ,पुण्यास होतो. तेव्हाची ही गोष्ट. तेथे रामचंद्रशास्त्री साठे म्हणून एक मोठे पंडित होते. त्यांच्या हाताखाली राहून मी वेदांचा अभ्यास करीत होतो. अधूनमधून मी शनवार वाड्यात जात होतो. तेथे मला नेहमी अमृतवाणी ऐकू येई. बाजीराव पेशव्यांची पत्नी वाराणशीबाई गीतेचे श्लोक म्हणत असत. गीता मधुर, बाईचा आवाजही मधुर त्यामुळे ते अमृताहून गोड वाटे. ती अमृतगंगा ऐकून माझे मन उचंबळून येई. आणि एके दिवशी मी मनोमन प्रतिज्ञाच घेतली."

" कोणती प्रतिज्ञा ? " लक्ष्मीने कौतुकाने विचारले.

अनंतशास्त्री निश्चयाने सांगू लागले, " मी अशी प्रतिज्ञा घेतली की आपल्या घरच्या सर्व बायकांना मी विद्या देणार!"

" विद्या देणार ? पण बायका शिकल्या तर त्यांचे वाईट होते ना ? " लक्ष्मीने भीत भीत विचारले.

" कोण म्हणतो बायका शिकल्या तर वाईट होते ? " अनंतशास्त्रींनी उलट विचारले, " पांडवांची द्रौपदी शिकलेली नव्हती का ? वेदकाळातील गार्गी, मैत्रेयी तर महापंडिता होत्या. पूर्वी सर्वच स्त्रिया शिकत होत्या. त्यांचे काय वाईट झाले ? "

लहानग्या लक्ष्मीच्या डोळ्यासमोर त्या तेजस्विनींची चित्रे दिसू लागली. तिच्या डोळ्यात नवीन आनंद चमकू लागला. अनंतशास्त्रींनी त्या बालमनाची उत्सुकता व आनंद जाणला. त्यांनी हळुवारपणे विचारले, " लक्ष्मी, तू वयाने लहान आहेस पण मनाने मोठी आहेस. तुझ्याबद्दल मला काय वाटते, सांगू ? "

लक्ष्मी आनंदून गेली. पण बावरलेल्या स्वरात म्हणाली, " हो ! सांगा ना ! "

अनंतशास्त्रींच्या मनांतील संकल्प मोहरून उठला. ते अगदी गदगदून गेले व म्हणाले, "लक्ष्मी मला वाटते, तुला खूप खूप शिकवावे. संस्कृत ही देववाणी....नव्हे अमृतवाणी आहे. ती दिव्य वाणी तुला शिकवावी. आणि तुझ्या तोंडून मी ऐकावी.



भगवान श्रीकृष्णाची गीता....कालिदासाचा रघुवंश....केवढे मोठे ते ज्ञानभांडार आहे. ते सारे मी तुझ्यापुढे खोलून ठेवीन. तू ते सर्व ज्ञान लुटून घे. आणि एक आगळेच तेजस्वी स्त्रीजीवन जगासमोर उभे कर!"

अनंतशास्त्रींच्या मनात रुजलेली ती आशा बोलत होती. आणि त्यांच्या डोळ्यासमोर लक्ष्मी....नव्हे मूर्तिमंत सरस्वतीच

बनलेली लक्ष्मी उभी होती. त्या लहानग्या लक्ष्मीला अनंतशास्त्रींचे हे आगळेच भव्य आणि स्वप्नमय रूप पाहून वेगळाच आनंद वाटत होता. आपल्या पतिदेवाचे हे दिव्यत्व पाहून तिचे मन भरून आले. तिचा ऊर दाटून आला व ती म्हणाली, "होय ! मी शिकेन तुमच्यापाशी !"

हे लाख मोलाचे शब्द अनंतशास्त्रींनी ऐकले मात्र ! त्यांना आकाश ठेंगणे वाटले. त्यांच्या आशेने नव्या संकल्पाची घटस्थापना केली. निश्चयाने प्रयत्नाची पराकाष्ठा करण्याची शपथ घेतली. आणि त्यांच्या जीवनाने काटयाकुटयांचा पण तेजस्वी मार्ग आक्रमण्यास सुरवात केली.

## ६. वन्ही चेतला

अनंतशास्त्रींनी ज्ञानाचा दीप लावला आणि लक्ष्मी त्या दीपाच्या प्रकाशाने उजळू लागली. अनंतशास्त्री सांगत आणि लक्ष्मी म्हणत असे.

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।

तस्मादुतिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय: ।। "

अनंतशास्त्रींच्या आईच्या कानावर लक्ष्मीचे ते गोड बोल पडले मात्र ! तापलेल्या शिसाचा रस कानात जावा अशी ती भडकून उठली.

"कोण ? सुनबाई ? सुनबाईच का तू ? चांडाळणी, कुठून आठवली ही अवदसा तुला ? विद्या शिकते म्हणे....!"

अनंतशास्त्री या प्रहाराला तोंड देण्यास सज्ज होतेच. ते आईची समजूत घालू लागले. "आई, आई, तिला का शिव्या देतेस ? मी तिला संस्कृत गीता शिकवत आहे. म्हणून ती शिकत आहे. हा पत्नीधर्म नाही का ?"

आई जास्तच संतापली, "जळलं तुझं तोंड ! आपल्या बायकोला शिकवतोस ! अरे पायातला जोडा पायातच ठेवायचा की उचलून डोक्यावर मिरवायचा ? ती बिचारी यमुना ! सुटली बिचारी ! तिनं नाही असली पातकं केली. पण या घोंडीला ती अक्कल नाही...."

अनंतशास्त्री शांतपणे बोलू लागले, "आई, शांत हो ! ऐक माझे. अग, संस्कृत ही देववाणी आहे. तिचा अभ्यास केल्याने पातक कस लागेल ? त्यातून पूर्वीच्या स्त्रियादेखील शिकत होत्या. गार्गी, मैत्रेयी अशा कितीतरी मोठ्या वेदपंडिता होत्या. द्रौपदी, सावित्री, सत्यभामा या चतुर स्त्रियादेखील शिकलेल्या होत्या. मग आजच स्त्रियांनी शिक्षण घेतले तर काय बिघडले ?"

आई म्हणाली, "त्यांचे काय मला सांगतोस ? आधीच हे कलियुग ! आणि त्यात अशी पातकं बायकांनी का करावी. बाबारे, आम्हा बायकांचा जन्म महापातकातून आलेला ! आणखी या जन्मी अशी पापं केली तर आमच्या बेचाळीस पिढ्या नरकात जाऊन पडतील !"

"शिक्षणाने बेचाळीस पिढ्या नरकात कशा जातील ? त्यापेक्षा समाजातील स्त्रिया आणि पुरुष दोघेही शिकले तर पुढील शंभर पिढ्या स्वर्गसुख भोगतील !" अनतशास्त्री काहीशा आत्मविश्वासाने उत्तरले.

आई संतापली, "अनंता, चूप बैस ! साऱ्या घरादारात अनर्थ, अधर्म माजवलास कारट्या तू ! भूताप्रेतांच्या पूजा बंद केल्यास, व्रतवैकल्ये बंद केलीस....आणि त्यात....हे....महापातक ....बायकोला गीता शिकवतोस.... ! अरे बाबा, बायको माणूस शिकले तर काय होते, माहीत आहे ? "

"काय होते, सांग पाहू ?" अनंतशास्त्रींनी विचारले.

"अरे," आई समजावणीच्या सुरात बोलू लागली, "अरे, शिक्षणामुळे....ती बाई....विधवा होते !!"

अनंतशास्त्रींनी झटकून म्हटले, "हँ....हा एक मोठा गैरसमज आहे. ह्याला शास्त्राधार नाही...."

मायलेकरांचा हा कडाक्याचा वाद बाहेरून दोन पंडित ऐकत होते. ते आत शिरले आणि अनतशास्त्रींशी वाद घालू लागले.

एकजण तावातावाने बोलू लागला. " कोण....कोण म्हणतो शास्त्राधार नाही म्हणून ? आज हजारो वर्षे चालत आलेल्या रूढी काय सांगतात ? म्हणे शास्त्राधार नाही ! तुम्ही मोठे शास्त्री म्हणवून घेता स्वतःला ! पण धर्मबुडवे....कुळधर्माला कलंक लावणारे आहात !"

दुसरा पंडित कुचेष्टेने बोलू लागला,. "आम्ही ऐकले होते ....पाहिले नव्हते ! अनंतशास्त्री म्हणे आपल्या बायकोला गीता शिकवतो....हं....आज ऐकले आणि पाहिले पण ! हे काय नवीन खूळ आणले आहे ! पापाचा घडा अजून भरला नाही वाटते ? "

पहिला पंडित उसनी सहानुभूती दाखवू लागला. " तुमचे वडील मोठे दशग्रंथी ब्राह्मण ! केवढी त्यांची विद्वता ! केवढी

प णशक्ति! आचाराने कर्मठ. आणि त्यांचेच तुम्ही चिरंजीव ! वेदांचा सांगोपांग अभ्यास केलेले ! चारही दिशांना तीर्थाटने केलेले ! आणि तुम्ही असा भ्रष्टाकार सुरू करावा ! बायकोला शिकवता ! पण या अनाथ माउलीच्या जिवाला केवढचा घोर यातना देत आहात. छे छे ! कलियुगाचा हा प्रताप ! !"

अनंतशास्त्रींनी स्वत:ला सावरून धरले व ते बोलू लागले, "होय ! माझ्या विद्वान वडिलांचाच मी सुपुत्र ! मीही वेद, उपनिषदे, पुराणें सर्वांचा अभ्यास केला आहे. साऱ्या देशभर तीर्थयात्रा केली आहे. या सर्व अध्ययनातून मला हेच दर्शन घडले की स्त्रीची उन्नति शिक्षणानेच होईल. पण स्त्रीची जर उन्नति केली नाही तर समाजाला प्रगतीची वाट कधीही दिसणार नाही. मला तर पुढे जाऊन असेही वाटते की बालविवाहाची पद्धति बंद करावी. मुलींना लहानपणीच शिक्षण दिले जावे व मोठेपणी त्यांचा त्यांनीच विवाह ठरवावा. आणि सुखी जीवन जगावे."

पंडित संतापून बोलू लागला, "बस करा तुमचे ज्ञान ! आमच्या समोर नका दाखवूं ! आपल्या ज्ञानाचा प्रताप दाखवायचा असेल तर घ्या आव्हान आम्हा ब्रह्मवृंदाचे ! श्रीमान शंकराचार्यांसमोर वाद निकालात काढू आणि तेथेच निकाल लावू ! असेल हिंमत तर या पुढे ! मोठी ज्ञानाची प्रौढी मिरविता......."

अनंतशास्त्री निश्चयाने बोलले, "शास्त्रीबुवा, मी कशाला मिरवू प्रौढी ? ज्ञानाचा एक डोळस अभ्यासक आहे मी ! पण मी तुमचे हे आव्हान स्वीकारत आहे. माझ्या विचारांना आणि

आचारांना शास्त्राचा आधार आहे हे मी लेखी सप्रमाण सिद्ध करून दाखवीन. आणि मला विश्वास वाटतो कीं मी यशस्वी होईन....''

"कशाला ? कशाला वल्गना करता शास्त्रीबुवा ?'' उपहासाने पंडित बोलू लागले, "या....या....असे रणांगणावर आणि दाखवा आपली बहाद्दुरी....आणि शेवटी स्वत:ची संपूर्ण फजिती करून घेऊन सबंध समाजाचा बहिष्काराचा वणवा ओढून घ्या....'' दोघेही पंडित तणतणत निघून गेले.

"हो ! त्या वणव्यात जळून खाक झालो तरीही हरकत नाही. पण माझे सत्याचे ब्रीद मी सोडणार नाही'' अनंतशास्त्रींनी अत्यंत धीमेपणाने, शांतपणाने आव्हान स्वीकारले.

अनंतशास्त्रींची आई या प्रकारामुळें अस्वस्थ झाली. आणि त्यांची समजूत घालू लागली. "अनंता, ऐक माझे ! अरे, कसले सत्य हे ! असल्या खुळापायी केवढे मोठे संकट ओढवून घेतोस ? थोडेसे शहाणपण धर. आपला उद्योग, कामधंदा आणि हा संसार आपला व्यवस्थित कर.''

पण अनंतशास्त्री आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत. ते गंभीर झाले, "आई, याला वेड म्हणत नाहीत. यालाच शहाणपण म्हणतात. स्त्रियांना आजवर पापी, अमंगळ, जनावरासारखे मानले गेले. त्यांचा आजवर मोठा छळ केला गेला आणि हे सारे शास्त्राधिष्ठित असा गैरसमज पसरविला गेला. मला हे मोडून टाकायचे आहे. मी लक्ष्मीला शिकवणार आणि एक नवे तेजस्वी स्त्रीजीवन समाजापुढे उभे करणार यापायी मला वाटेल तो त्याग करावा लागला तरी हरकत नाही....''

आई संतापून उठली आणि निर्वाणीचे बोल बोलली, "एवढेच असेल तर ऐक. सारा समाज तुझ्यावर बहिष्कार तर घालेलच. पण हे घरही तुला सोडावे लागेल. तुझे हे खूळ तुला सोडायचे नसेल तर या घरातून काळे कर. जंगलात जा. नाहीतर मसणात जा....चालता हो."

अनंतशास्त्रींचे मन हादरले. आईवरील मायेने त्याचे डोळे पाणावले. पण निश्चयाने त्यांच्या मनाला प्रतिसाद घातला. त्यांचे मन ध्येयावर आरूढ झाले.

बिचारी लक्ष्मी मात्र अर्धमेली होऊन गेली !!

## ७. तेजाचे बळ

तो प्रसंगच मोठा कठिण होता. कशाची उपमा शोभेल त्याला ?

भयंकर सोसाट्याचा वारा सुटावा. प्रचंड वादळाचे थैमान चालू असावे. आणि या वादळाला खंबीरपणे तोंड देत एकच एक महान वृक्ष उभा असावा. मोडेन पण वाकणार नाही असाच त्याचा बाणा दिसत असावा !

असाच प्रसंग होता तो !

शिरूर गावातील गोष्ट ती. उडुपीच्या प्रमुख धर्मगुरूंकडे एक गंभीर फिर्याद गुदरली गेली होती. आणि या वादासाठीच ही सभा भरली होती.

धर्मगुरु आपल्या आसनावर बसले. त्यांनीं सभोवार पाहिले. एका बाजूला चारशे शास्त्रीपंडित बसले होते. दुसऱ्या बाजूस एकच एक पण तेजस्वी पंडित अनंतशास्त्री बसले होते. त्यांच्यापुढे एक हस्तलिखित ग्रंथ दिसत होता.

धर्मगुरूंनी आज्ञा केली आणि चारशे पंडितांपैकी एक पंडित उभा राहिला. त्याने सर्वांचे वतीने अनंतशास्त्रींविरुद्ध एक फिर्याद मांडली. ती अशी होती.--

"अनंतशास्त्री डोंगरे हा एक धर्मभ्रष्ट पापी माणूस आहे. तो आपल्या बायकोला देववाणी शिकवतो व समाजातील प्रत्येक स्त्रीने विद्या शिकावी असे उघडपणे सांगतो. त्याचप्रमाणे पुरातन कालापासून चालत आलेल्या रीतीभाती बंद कराव्या असेही सांगतो. त्याने स्वत:च्या घरातील भूतप्रेत पिशाच्चयोनी यांच्या पूजा बंद केल्या आहेत. अनेक व्रतवैकल्ये बंद केली आहेत. त्याचप्रमाणे स्त्रीने शिक्षण घेतल्यानंतर प्रौढपणी स्वत:च वर-संशोधन करून विवाह करावा असे तो सांगतो. बालविवाहाच्या पद्धतीविरुद्ध त्याने आपले विचार वारंवार मांडले आहेत. एकूण त्याचे सर्वच विचार आणि आचार धर्माच्या व शास्त्राच्या विरुद्ध आहेत. आमच्या सर्वानुमते तो धर्माला कलंक लावणारा महान पापी माणूस आहे. अशा पापी माणसाला जबरदस्त शिक्षा देणे हे धर्माच्या रक्षणाला अत्यंत आवश्यक आहे. आपल्या श्रेष्ठ न्यायासनाने याचा पूर्ण विचार करून त्याला दोषी ठरवावे व शिक्षा द्यावी, असे आम्हा चारशे धर्मरक्षक पंडितांचे निश्चित मत आहे."

धर्मगुरूंनी मोठ्या गंभीरपणे ही फिर्याद ऐकली. व अनंतशास्त्रींकडे वळून ते म्हणाले, "आपले काय म्हणणे आहे ते आता सांगा."

अनंतशास्त्री धीमेपणानें उठले. प्रथम त्यांनी आपल्या धर्मगुरूंना अत्यंत आदराने नमस्कार केला. व नंतर आपला हस्तलिखित ग्रंथ समोर ठेवून वादाला उत्तरे देण्यास प्रारंभ केला. या हस्तलिखित ग्रंथामध्ये त्यांनी श्रुती, स्मृति, पुराणे, उपनिषदे, महाभारत, रामायण वगैरे सर्व पुरातन ग्रंथातील स्त्रीशिक्षणास अनुकुल असे विचार एकत्र गुंफले होते. त्या अनुरोधाने त्यांनी आपले अनेक मुद्दे मोठ्या प्रभावितपणे सिद्ध केले होते. हा सबंध वाद लेखी चालू होता. आणि तो सतत दोन महिने चालू होता. या वादामध्ये अनंतशास्त्रींनी प्रामुख्याने काय सांगितले ?

"आपल्या धर्मात वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, असे फार मोलाचे ग्रंथ आहेत. या सर्व ग्रंथांचा डोळसपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. वेदातील ऋचा किंवा गीतेचे श्लोक तोंडपाठ असणे यात अर्थ नाही. पण या सर्व श्लोकामागे केवढा अर्थ भरलेला आहे हे समजून घेणे आवश्यक आहे."

"अशा दृष्टीने तत्कालीन समाजाची स्थिति पाहिली तर काय दिसते ? रामायण, महाभारतकालीन समाज हा फार प्रगत समाज होता. समाजात मोठमोठे ज्ञानी ऋषी होते. महापराक्रमी पुरुष होते. महान कलावंत होते. मोठमोठे संशोधक होते. त्याचप्रमाणे स्त्रीदेखील मागासलेली नव्हती. ज्ञानी ऋषीमुनींशी वेदचर्चा करणाऱ्या गार्गी मैत्रेयी अशा ज्ञानी विदुषी होत्या. सीता सावित्री सारख्या ज्ञानवती पतिव्रता होत्या. प्रत्यक्ष धर्मराजाला देखील भरसभेमध्ये द्यूतासंबंधी योग्य उपदेश करणारी ज्ञानी द्रौपदी होती आणि भगवान श्रीकृष्ण देखील दरबाराच्या कामकाजात आपल्या मातेचा सल्ला घेत असत. अशा प्रखर बुद्धिमत्तेच्या स्त्रिया त्याकाळी आपणास दिसतात."

"अशी स्थिती त्या समाजाची होती. त्या समाजाचा गाडा ओढणारी स्त्री व पुरुष ही दोन्ही चाके भक्कम होती. म्हणूनच तो समाज अत्यंत भरभराटीस आलेला दिसत होता."

"पण आज ? आज समाजाची स्थिति कुजलेल्या सडलेल्या डबक्यासारखी आहे. येथे स्त्रीला माणूस म्हणून किंमत नाही. तिची अवस्था सडक्या किड्याप्रमाणे आहे. त्यामुळे समाजाची प्रगती थांबलेली आहे. अनिष्ट विचार व दुष्ट रूढी यांचे महत्त्व वाढले आहे. हे सर्व थांबवले पाहिजे व समाजाला प्रगतीची वाट आपणच धर्मपंडितांनी दाखवली पाहिजे."

"यासाठी बालविवाह बंद केला पाहिजे. प्रत्येक स्त्रीला संपूर्ण शिक्षण दिले पाहिजे. तिचे मन सुसंस्कृत केले पाहिजे व तिचा तिनेच विवाह केला पाहिजे. त्यामुळे तिचा संसार सुखाचा होईल. आणि अशा रीतीने समाज प्रगतीची वाट चालू लागेल. व आपल्या देशाला पुन्हा समृद्धीचे वैभवाचे दिवस लाभतील."

असा हा लेखी वाद दोन महिने चालू होता. अनंतशास्त्रींनी आपल्या विवेचनात अनेक उतारे लिहिले आणि आपले विचार पटवून देण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या सखोल अभ्यासाचा धर्मगुरूंवर मोठा परिणाम झाला. अनेक ज्ञानी, शास्त्री-पंडित त्यांच्या अध्ययनामुळे प्रभावित झाले व त्यांनी अनंतशास्त्रींच्या बाजूने निकाल दिला ! अनंतशास्त्रींच्या या मोठ्या ग्रंथावर त्यांनी सह्या देखील केल्या.

अनंतशास्त्रींनी फार मोठा विजय मिळवला व चारशे धर्मरक्षक पंडित हरले. गतानुगतिकत्वाचे रूढ विचार नामोहरम झाले. पण काळाला हा विजयाचा ओघ सहन झाला नाही. समाजाला हा विजय रुचला नाही, पटला नाही व सबंध शास्त्री-समाजाने अनंतशास्त्रींवर संपूर्ण बहिष्कार टाकला.

# ८. तुफानामध्येच शांती

अनंतशास्त्रींनी फड जिंकला आणि विजयाचे मोठे समाधान त्यांना मिळाले. स्वत:च्या बुद्धिमत्तेवर, चिकित्सक अध्ययनावर त्यांचा पूर्ण विश्वास होता म्हणूनच हा विजय ते मिळवू शकले. पण हा विजय फार महागात पडला, कारण समाजाकडून होणारा कायदेशीर बहिष्कार जरी टळला होता तरी शास्त्रीपंडितांचा स्वयंस्फूर्त बहिष्कार टळला नव्हता. अनंतशास्त्र्यांना त्यांनी पूर्णपणे वाळीत टाकले होते. त्यांच्यावर निंदानालस्तीचे, विटंबनेचे अहेर उधळले जात होते.

अनंतशास्त्री समाजाच्या या वृत्तीमुळे फार संतापून गेले. आणि त्यांनीही समाजाला ठणकावून उत्तर दिले, " मी तुम्हाबरोबर कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवलेला नाही. तुम्ही माझ्या कामात विनाकारण ढवळाढवळ करू नये. कर्तव्य व अकर्तव्य यांचे ज्ञान माझ्यापुरते मला आहे. मी एक ईश्वराला भिऊन चालेन पण न्याय्य कृत्यांत समाजाला भिऊन त्याच्या स्वाधीन होऊन राहणार नाही. समाजापैकी कोणाला वाटेल त्याने माझ्याशी संबंध ठेवावा, नाही त्याने ठेऊ नये."

अनंतशास्त्रींच्या ध्येयवादी मनाला समाजाचा हा अंतर्गत जहरी विरोध सहन होणे शक्यच नव्हते. त्यामुळे ते समाजाशी फटकून वागू लागले.

अशा क्षुब्ध मनस्थितीत जेव्हा ते घरात डोकावत त्यावेळी त्यांच्या मनाला एका लक्ष्मीखेरीज कोणीच दिलासा देऊ शकत नव्हते. आईची धुसफुस सतत चालत राही व ती सतत संतापून

बोले, "बायकोला शिकवतोस तर या घराबाहेर चालता हो. जंगलात जा नाहीतर मसणात जा."

आईवरील मायेने त्यांचे मन व्याकूळ होई. त्यांचे सात्त्विक मन कळवळून उठे. कशासाठी हा विरोध ! मी लक्ष्मीला शिकवतो म्हणून ! !

आणि सारा गतेतिहास त्यांच्या डोळ्यासमोरून सरकत जाई. अध्ययनासाठी घरदार सोडले. पण वडिलांनी केलेल्या अफाट कर्जामुळे संसार रसातळाला जाण्याची वेळ आली. अशा-वेळी अनंतशास्त्री धावून गेले. आपल्या कर्तबगारीने व ज्ञानाने पैसा मिळवला. आणि सारे कर्ज चुटकीसारखे फेडून टाकले. त्यानंतर वडील वारले व आईवर त्यांनी पाखर घातली. सबंध संसार सुरक्षित वाटेवर आला.

पण त्यांच्या मनाची धाव रूढीच्या कुंपणापर्यंत थांबू शकत नव्हती. ते पुढे जाऊ पहात होते. नवा मार्ग आक्रमू पहात होते. नवा मार्ग व रूढ मार्ग यांचा संघर्ष येथेच सुरू झाला. आणि आईने त्यांना रूढ मार्गावर खेचण्याचा प्रयत्न केला पण तो विफल झाला. त्यामुळे आईच्या संतापातून वनवासाचा मार्ग त्यांना दिसू लागला.

समाजाचा संताप, आईचा संताप यातून होणारा मनस्ताप त्यांना जाळू लागला. लक्ष्मी देखील तडफडू लागली. आता मात्र समाजाची गरज अनंतशास्त्रींना अडवू शकत नव्हती. आईची माया वेडावू शकत नव्हती. त्यांनी आपली दृष्टि लांबवर लावली. तेथे त्यांना काय दिसत होते ?

ते होते गंगामूळ अरण्य. त्यांच्या गावापासून नऊ मैल दूर असलेले ते भयंकर निबिड अरण्य. सतत मुसळधार पाऊस. धों

घों  हणाऱ्या तुंगा, भद्रा आणि वेत्रावती नद्या. उंच वाढलेली ती  किर्र झाडी आणि त्यामध्ये वास्तव्य करणारी ती महा-भयं  हिंस्त्र श्वापदे, हिंस्त्र जनावरे.

आणि याहिपेक्षा भयानक अशी ती दंतकथाच अनंतशा-स्त्रीं  डोळ्यासमोर उभी राहिली, " त्या गंगामूळ अरण्यात जाग  देवता राहतात. महाकोपिष्ट ऋषी राहतात. त्या अर-ण्या  र ह्यांचीच मालकी आहे. परका माणूस आलेला त्यांना मुळ  खपत नाही. एखादा यात्रेकरू दुर्दैवाने आलाच तर त्याने तीन  त्रसाचे आत तेथून निघून गेले पाहिजे असा त्यांचा मोठा कडक  क आहे. आणि तो यात्रेकरू जर गेला नाही तर हा दंडक म  ला जातो. त्यामुळे त्या देवता व ऋषी भयंकर क्रुद्ध होतात.  त्रंड घंटानाद व शंखनाद सुरू होतात. त्या आवाजा-बरोबरच  स्त्र पशू धावत येतात आणि त्या दुर्दैवी जीवाचा फडशा पाड  त. किंवा त्या भयंकर नादामुळे प्रचंड वणवे भड-कले जातात  नो यात्रेकरू त्यात जळून खाक होतो."

असे हे  यंकर अरण्य! आणि अशी ती भयानक दंत-कथा! पण अनंतशास्त्रींचे मन तेथेच धाव घेऊ लागले. त्यांच्या मनाला या भयानकतेमध्येच अपूर्व शांतता दिसू लागली. अपूर्व समाधान भासू लागले. तेथेच त्यांच्या दिव्य स्वप्नाची साधनापूर्ती होणार असा विश्वास त्यांना वाटू लागला आणि मोठ्या ईर्षेने, आत्मविश्वासाने व उत्साहाने उठले.

मध्यरात्रीच्या शांत वेळी गाढ झोपलेल्या लक्ष्मीला त्यांनी उठवले. आणि तिला ते म्हणाले, " ऊठ चल."

झोपेच्या गुंगीतच धास्तावून लक्ष्मीने विचारले, " कुठे ? या वेळी...."

अनंतशास्त्री दाराकडे पावले टाकीत म्हणाले, "चल माझ्या मागोमाग....गंगामूळ अरण्याकडे...." आणि ते बाहेर पडले ! बिचारी लक्ष्मी ! झोप खाडकन उघडली तिची. धडपडत उठली. एक पासोडी पांघरून घेतली तिने आणि पतीच्या मागोमाग धावत धावत निघाली.

अनंतशास्त्री ऐन मध्यरात्री एक वस्त्रानिशी घराबाहेर पडले. पाणावलेलें डोळे त्यांनी झरकन् एका हाताने पुसले आणि काळोखाच्या जगाकडे खंबीरपणे दृष्टी फेकत झपाझप चालू लागले.

तो काळाकुट्ट अंधार. असंख्य खाचखळग्यांनी आणि काटयाकुटयांनी भरलेली ती वाट सरसर तुडवीत अनंतशास्त्री वेगाने जाऊ लागले. पंधरा वर्षांची ती कोवळी पोर अडखळत, धावत, पळत पतीच्या मागोमाग जाऊं लागली.

## ९. जंगलातून मंगलाकडे

नऊ मैलाची ती वाट दोघांनी झपाझप तोडली आणि ते दोघे अरण्यामध्ये शिरले. भयाण अरण्य ते ! प्रचंड अजगरांचे फूत्कार ऐकू येत होते. वाघसिंहाच्या गर्जना सारे अरण्य हादरून टाकत होते. कोल्हेकुई तर सतत चालूच होती.

निवाऱ्याची जागा पाहून अनंतशास्त्री थांबले. लक्ष्मीकडे पाहिले त्यांनी. श्रमाने आणि भीतीने घामाघूम होऊन थरथरत उभी होती बिचारी ! एका प्रचंड शीळेजवळ त्यांनी तिला बसवले आणि ते स्वतः पहारा देत जागत बसले.

थोड्या वेळातच एक प्रचंड ढाण्या वाघ डरकाळ्या फोडीत आला. अनंतशास्त्रींनी लक्ष्मीला पासोडीमध्ये लपवले आणि चटकन् काटेकुटे जमवून पेटवून दिले. ती अकस्मात् आग पाहून ढाण्या वाघ जोरजोरात आरोळ्या फोडीत उडी मारून पळून गेला.

गंगामूळ अरण्याच्या दंतकथेने अनंतशास्त्रींची ही सत्त्व-परीक्षाच घेतली जणू ! पण याही कसोटीस ते पूर्णपणे उतरले.

हळुहळू पूर्वदिशा उजळू लागली. अनंतशास्त्रींनी ती रम्य शोभा पाहिली. उष:प्रभेला नमस्कार केला. आता अरण्याचे रौद्र भयानक तांडवनृत्य संपून गेले. तो काळोख संपला. ती निराशा संपली. गंगामूळ अरण्याचे ते मनोवेधक रमणीय स्वरूप अनंतशास्त्रींना दिसू लागले. त्यांचे मन प्रसन्नतेने उजळून निघाले आणि त्यांनी पासोडीमध्ये गुरफटून लपलेल्या लक्ष्मीला उठवले. बिचारी भीतीने अर्धमेली झाली होती. घामाने डबडबून गेली होती पण त्या उषेइतकीच ती सुंदर दिसत होती. अनंत-शास्त्री तिच्याकडे पाहून प्रसन्नपणे हसले आणि म्हणाले, " लक्ष्मी, येथेच थांबून चालणार नाही. अरण्यातच डोंगर–माथ्यावर हिंडून आपणास एखादी चांगली निवाऱ्याची जागा पाहिली पाहिजे आणि रात्रीपर्यंत साधी झोपडी तयार केली पाहिजे. आता आपला नवा संसार सुरू होणार........"

अनंतशास्त्रींच्या प्रसन्न हास्याने आणि मधुर बोलाने लक्ष्मीचा थकवा दूर झाला. ती चटकन उठून उभी राहिली. चिमुरड्या लक्ष्मीची ही उभारी पाहून अनंतशास्त्रींचा उत्साह दुणावला आणि दोघेही अरण्यात हिंडू लागले. कंदमुळे व रानफळे खात खात ते दोघे डोंगरमाथ्यावर जाऊ लागले.

जागेचा शोध घेता घेता त्यांच्या दृष्टीला समोर एक मोठा डोंगर दिसला. तुंगा नदी त्या डोंगरावरून खळाळत वाहत होती. ते लक्ष्मीला म्हणाले, " चल, आपण त्या डोंगरावर जाऊ. तेथेच राहण्यासाठी योग्य जागा सापडेल."

दोघेही मोठ्या उमेदीने डोंगर चढून गेले आणि अनंतशास्त्रींना हवी तशी जागा मिळाली. तुंगा नदीच्या कांठीं एका लहानशा जागेत घर बांधण्याचा त्यांनी निश्चय केला.

दोघेही कामास लागले. जागा साफसूफ केली. लाकुड–फाटा गोळा केला. दगडमाती एकत्र केली. अनंतशास्त्रींचा कष्टाचा कणखर हात सरसर काम करू लागला. लक्ष्मीचे रसरशीत हात सौंदर्य निर्माण करू लागले. जमीन तयार झाली. कुडाच्या भिंती उभारल्या गेल्या. पानाचे छप्पर घातले गेले. आणि हां हां म्हणता रामाची सुंदर पर्णकुटी तयार झाली. संध्याकाळ होण्याचे आतच दोघांनी निवारा निर्माण केला.

नवनिर्मितीच्या सृष्टीमध्ये शरीर कष्टाने थकते एकवेळ ! पण मन थकत नाही. मनाच्यासमोर तरळत राहणाऱ्या दिव्य स्वप्नामुळे त्याची उभारी कायम राहते. वाढतच जाते. गंगामूळ अरण्यातील तो पहिला दिवस आणि ती पहिली निवाऱ्याची रात्र संपली. असे अनेक दिवस संपले आणि रात्रीही संपल्या. पण अनंतशास्त्रींच्या त्या स्वप्नसृष्टीत दिवस कधी मावळला नाही. प्रकाश कधी संपला नाही.

अनंतशास्त्रींचे मन समाधानाच्या मार्गावरून धावू लागले. मिळालेले समाधानच अपुरे वाटू लागले. त्यांना व त्यांच्या कल्पनाशक्तीला नवे नवे उन्मेष–अंकुर येऊ लागले. कर्तृत्वशक्तीला बहर येऊ लागला.

त्या डोंगरमाथ्यावरील जागेमध्ये टीचभर जागेतील राजाराणीचा संसार त्यांना पसंत पडला नाही. त्यांनी चांगली मैलभर जागा कापून साफ केली. अनंतशास्त्रींनी नदीच्या काठी स्वत:साठी एक टुमदार घर बांधले. आजुबाजूला गाईगुरांचे गोठे बांधले. यात्रेकरूंसाठी घरे बांधली. शिष्यवर्गासाठीही खोल्या बांधल्या.

हळूहळू तेथे भातशेती डुलू लागली. नारळीपोफळी सरसरत आभाळाला भिडू लागली. केळी वाढू लागली. बागाईत बहरू लागली. लक्ष्मीच्या हौसेची फुलझाडे शोभू लागली. डोलू लागली.

गुरांच्या गोठ्यातून गाई हंबरू लागल्या. डोंगरमाथ्याची हवा खाऊन वासरे हुंदडू लागली. अनंतशास्त्रींनी एक एक करता करता शंभर सव्वाशे गुरे पाळली. रामाच्या पर्णकुटीचें रूपांतर कृष्णाच्या गोकुळात झाले.

अनंतशास्त्री व लक्ष्मी या दोघांनीही अपार कष्ट घेतले आणि त्या भयानक अरण्याचे नवीन सुंदर सृष्टीत रूपांतर केले. त्याचबरोबर अनंतशास्त्रींनी लक्ष्मीची विद्याही चालू ठेवली. लक्ष्मीला त्यांनी गीता, अमरकोश, पुराणे वगैरे सनातन ग्रंथ शिकवले. लक्ष्मी आता पंडिताच बनू लागली. नव्हे ! लक्ष्मीचे रूपांतर साक्षात् सरस्वतींत होऊ लागले.

अनंतशास्त्रींची विद्वत्ता अतुलनीय होती. त्यांच्या विद्वत्तेची कीर्ति ऐकून अनेक विद्यार्थी तेथे येऊ लागले व त्यांच्याबरोबर राहू लागले. त्यांच्या सहवासात कष्ट घेऊ लागले. विद्या शिकू लागले आणि आनंदाने व निर्भयपणाने अरण्यात वावरू लागले. अनंतशास्त्रींनी एक आदर्श असे गुरुकुल स्थापन केले.

गंगामूळ अरण्याची रौद्रता नष्ट झाली व तेथे एक दिव्य अशी नवसृष्टी तयार झाली. या सृष्टीमध्ये ज्ञानाचे पावित्र्य होते. कर्तृत्वाचे समाधान होते. मनाची भव्य शांतता होती. आता तेथे दंतकथेवर विश्वास ठेवला जात नव्हता. आता तेथे कोणी दुष्ट देवता नाश करू शकत नव्हत्या. एवढे मोठे तेज या तपश्चर्येमुळे निर्माण झाले.

तेथे आता यात्रेकरू येत. अनंतशास्त्रींनी बांधून दिलेल्या घराघरातून राहत. अरण्यामध्ये निर्भय चित्ताने वावरत असत. अनंतशास्त्रींचे प्रेम व लक्ष्मीचे अगत्य यांचा ते मोठ्या आनंदाने स्वीकार करीत. तेथील वातावरणातील भीती संपली. संशय संपला. मनाचा मोकळेपणा निर्माण झाला.

अनंतशास्त्री व लक्ष्मी या दोघांनी या जंगलाचे मंगल केले.

## १०. अमरदीप

अनंतशास्त्री अधुनमधून कामानिमित्त गावामध्ये जात येत असत. असेच ते एकदा काम आटोपून परत येऊ लागले. चढता चढता ते अमळ थांबले व तेथूनच आपल्या वाडीकडे पाहू लागले.

डोंगरमाथ्यावरून वाहणारी ती नदी. तिच्या जवळच बसलेले ते लहानसे टुमदार घर. तो छोटासा सुंदरसा बगीचा. ती हसणारी रंगीबेरंगी फुलझाडे. पलीकडे बहरून आलेली ती बागाईत. वाऱ्यावरोबर मजेत पिंगा घालणाऱ्या त्या उंच उंच नारळीपोफळी आणि मखमलीसारखी चमकणारी ती हिरवी पिवळी भातशेती.

३७९६८ दि.
१२१३ ३·३·६५




एके काळी याच ठिकाणी एक महाभयंकर अरण्य सर्वांना भेडसावीत उभे होते असे कुणाला सांगूनही पटणार नाही. ती देखील एक दंतकथाच असावी असे वाटले असते कारण आज तर तेथे एक रमणीय असे नंदनवन फुलून उठले होते.

ते अपूर्व सौंदर्य पाहून त्यांच्या मनाला आनंदाचे भरते आले. या सौंदर्यकृतीमागे उभी असणारी त्यांची व लक्ष्मीची अचाट कर्तृत्वशक्ती; तो अभंग निश्चय; ती भव्य विचार-प्रणाली ! याचेच हे साक्षात स्वरूप ! ते पाहूनच नव्या उमेदीने ते पुन्हा डोंगर चढू लागले.

हळूहळू त्यांच्या कानावर कसला तरी गंभीर आवाज पडू लागला. गीतगंगेचाच तो ध्वनी होता ! कोणीतरी एकसंधपणे संस्कृत श्लोक म्हणत असावेत. अनंतशास्त्रींना वाटले की त्यांचा शिष्यवर्गच म्हणत असावा. पण त्यांना इतक्या पद्धतीने कोण सांगत असावे ? असा विचार करीत ते पुढे झाले. त्यांना काय दिसले समोर ?

शिष्यवर्ग एका झाडाखाली बसला आहे आणि समोर लक्ष्मी अत्यत गंभीरपणे बसली आहे. गीतेचा एकेक श्लोक ती सांगत आहे व शिष्यवर्ग तिच्या मागोमाग म्हणत आहे. लक्ष्मी आपल्या गोड आवाजात, खड्या सुरात अस्खलितपणे श्लोक सांगत होती ! अहाहा ! किती गोड वाटत होते ! किती मधुर भासत होते. अनंतशास्त्रींचे कान अगदी तृप्त झाले आणि त्यांनी आपले डोळे अतीव समाधानाने क्षणभर मिटून घेतले.

डोळे उघडले त्यांनी ! हीच का ती पूर्वीची चिमुरडी लक्ष्मी ? ही तर मोठी पंडिताच भासत होती. तिच्या मुखावरील



तो बालिशपणा, तो अजाणतेपणा आता दिसत नव्हता. तेथे विद्येचे तेज चमकत होते. त्यांची दृष्टी मनाला विचारत होती, "हीच का ती माझी लक्ष्मी ? ही तर सरस्वतीचा अवतार वाटते !! "

अनंतशास्त्रींच्या संकल्पाला हे एक अत्यंत विलोभनीय असे फळ आले होते. त्यांचे स्वप्न सत्यामध्ये साकार झाले होते. ही लक्ष्मी आता पंडिताच नव्हे पण गुरुपत्नी म्हणून शोभत होती.

अनंतशास्त्रींच्या मनाला कर्तृत्वपूर्तीचे मोठे समाधान मिळाले आणि नकळत त्यांचे हात जोडले गेले, "देवा, तुझ्या कृपेने माझे एक मोठे स्वप्न साकार झाले आहे. हा एक मोठा खजिनाच निर्माण झाला आहे खरा ! याचे रक्षण करणे आता, परमेश्वरा, तुझ्या हातात आहे...."

# ११. मानव करितो केवळ जगती घात मानवाचा

मानवी मनात सुंदर कल्पना अंकुरतात. मोठमोठ्या भव्य विचारांची दालने उभारण्याचा तो प्रयत्न करतो. पण कधी कधी राक्षसी मानवाचे हात ही सुंदर कल्पनासृष्टी मोडून टाकते. ते भव्य विचाराचे दालन जाळून टाकते.

अनंतशास्त्रींच्या जीवनात अशीच गंभीर घटना घडली.

या आश्रमीय संसारात अनंतशास्त्रींना एकूण सहा मुले झाली. त्यापैकी फक्त तीनच जिवंत राहिली. पहिली कृष्णा, दुसरा श्रीनिवास आणि सर्वांत लहान रमा. कृष्णा ही आपल्या आईसारखीच हुशार आणि चुणचुणीत. तिच्या शिक्षणाबद्दल तिच्या मातापित्यांनी खूप मोठे बेत रचले व त्याप्रमाणे ते तिला शिक्षण देऊ लागले, ती हुशार पोरही भराभर पुढे जाऊ लागली.

एके दिवशी अनंतशास्त्री कामानिमित्त आपल्या घरी गेले. आईशी थोडा वेळ बोलत बसले.

आईने विचारले, "कशी आहे कृष्णा ? श्रीनिवास, रमा बरी आहेत ?"

अनंतशास्त्री आनंदाने सांगू लागले, "वा ! सर्वजण मजेत आहेत. कृष्णा तर आता शिकू लागली आहे."

हे ऐकताच आईचा पारा चढला, "म्हणजे काय ? आता कृष्णेला का शिकवतोस ? लक्ष्मी शिकली. माझे ऐकले नाहीस. ती म्हणे पोरासोरांना पण शिकवते ! ऐकले आहे सारे मी !

अजून ही थेरं संपली नाहीत का ? आणि आता या पोरटीला पण शिकवतोस ? "

आईच्या संतापाचे तेच स्वरूप पाहून अनंतशास्त्री हतबुद्ध झाले, "पण आई मी हिला शिकवले, ह्यांत काय वाईट झाले ? मला तर तिचा अभिमान वाटतो...."

"बस कर ! मला नको सांगू तिचं कौतुक." आई ओरडली, "बायका शिकल्या म्हणजे नवऱ्याला सोडून पळून जातात."

"पण लक्ष्मी तर पळून नाही ना गेली ! कसा उत्तम चालला आहे आमचा संसार. बघ तरी एकदा...." अनंतशास्त्री समजूत घालू लागले.

"मला तिचं पुराण नाही ऐकायचं ! पण एकच गोष्ट निक्षून सांगते तुला. माझ्या कृष्णीचं आत्ताच लग्न करून टाक म्हणजे माझे डोळे समाधानानं मिटतील." आई उद्वेगाने म्हणाली.

"छे छे ! इतक्यात कशाला लग्न हवे तिचे ! त्यापेक्षा तिला खूप शिकू दे. मोठी पडिता होऊ दे. तिची तिला विचार-शक्ती आली की तिचा विवाह तीच ठरवेल."

अनंतशास्त्री समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांच्या आईचा संताप शिगेस पोहोचला. ती निर्वाणीच्या सुरात म्हणाली, "हे बघ अनंता, मला असलं आता काहीही सांगू नकोस. मी आता पिकलं पान झालंय ! केव्हा गळेल ते सांगता येत नाही म्हणून माझी म्हातारीची शेवटची इच्छा पुरी कर. माझ्या डोळ्यादेखत कृष्णीचं लग्न कर म्हणजे माझी कोणतीही इच्छा राहणार नाही. माझी शपथ आहे तुला."

अनंतशास्त्री न बोलताच उठले आणि आश्रमाची वाट चालू लागले. त्यांचे विचारचक्रही चालूच होते.

अनंतशास्त्री हळूहळू आश्रमात आले आणि त्यांनी सारी हकीकत लक्ष्मीला सांगितली. दोघांनाही मोठा पेचच पडला. कारण इकडे वृद्ध आईची इच्छा आणि दुसरीकडे स्वतःची ध्येयाकांक्षा !!

शेवटी दोघांनी मिळून एक तडजोड काढली. एखादा चांगला. सद्वर्तनी सुस्वभावी मुलगा पहावा आणि त्याचे कृष्णेशी लग्न करावे. पण लग्नापूर्वी मुलाला एक अट घालावी, की आश्रमात राहून त्याने शिक्षण पूर्ण करावे. कृष्णेचे पण शिक्षण या अवधीत पूर्ण करावे आणि नंतर दोघांचा संसार थाटून द्यावा.

अनंतशास्त्रींनी एक चांगलासा मुलगा पाहिला व कृष्णेसाठी पसंत केला. कृष्णा जरा नाखूषच होती कारण तिला विवाहापेक्षा विद्या पूर्ण करण्याची इच्छा होती. तरीपण अनंतशास्त्रींनी तिची कशीबशी समजूत घातली व तिला विवाहासाठी तयार केली. जावयाने शिक्षणाची अट मान्य केली व विवाहानंतर आश्रमात राहण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे कृष्णेचा विवाह झाला.

अनंतशास्त्रींची मुलगी व जावई दोघेही आश्रमात राहू लागले व शिक्षण घेऊ लागले. अनंतशास्त्रींच्या मनाला समाधानाची शांतता मिळाली.

पण ही शांतता वादळापूर्वीचीच ठरली. कारण अनंतशास्त्रींच्या मनाला व शरीराला शांतता मिळू द्यावयाची नाही असेच त्यांच्या दुर्दैवाने ठरवले असावे.

अनंतशास्त्रींचे गावातील हितशत्रू आपली कारस्थाने रचू लागले व या सुंदर संसारावर काळे दिवस डोकावू लागले. गावातील लोकांनी जावईबापूचे कान भरण्यास सुरवात केली. जावईबापूचे कानही हलके सापडले. त्यामुळे त्या लोकांना आणखीनच फावले. जावईबापूंना आपले हित व अहित याचे ज्ञान नव्हते. त्यामुळे त्यांची दृष्टी साफ बदलून गेली. त्यांना सासऱ्याच्या अटी बंधनकारक वाटू लागल्या. आश्रमीय वातावरणातील पावित्र्य हेच पाप वाटू लागले. त्यांचे शिक्षणातील लक्ष पार उडून गेले व एके दिवशी ते आश्रम सोडून पळून गेले.

या प्रकारामुळे अनंतशास्त्रींना व लक्ष्मीला फार मोठा धक्का बसला. बिचाऱ्या कृष्णेच्या जीवनाभोवती काळे वलय फिरू लागले. अनंतशास्त्री जावईबापूंना भेटले. त्यांची त्यांनी समजूत घातली. पण सारे व्यर्थ गेले !!

## १२. भंगली स्वप्ने--ओघळली अश्रूंची माला

जावईबापूंना वाईट छंद लागले गेले. गावातील दुष्ट लोकांच्या चिथावणीवरून ते कृष्णेचा छळ करू लागले. अनंतशास्त्रींच्या नावावर भरमसाठ कर्ज काढू लागले आणि चैन करू लागले. हळूहळू तो कर्जाचा डोंगर वाढतच गेला आणि अनंतशास्त्रींच्या त्या गोकुळाला....त्या गुरुकुलाच्या सुंदर कृतीला कर्जाचा भुंगा पोखरू लागला.

आकाशाला भगदाड पडू लागले तर कोण कुठवर ते बंद करू शकेल ? अनंतशास्त्री जावयाच्या या वागण्यामुळे हैराण

झाले. कर्जदाराचे अमंगल पाय त्या गोकुळात येऊन धरणे धरू लागले. कर्जाची रक्कम अवास्तव फुगत गेली. आणि अखेर तो काळा दिवस उजाडला. सर्व कर्जदार अनंतशास्त्रींच्या आश्रमावर जप्तीसाठी येऊन बसले ! कर्जदाराच्या विषारी नजरेतून त्या वाडीवर विषारी फूत्कार पसरू लागले.

अनंतशास्त्रींच्या मनावर वीज कोसळली. ज्या ठिकाणी स्वप्ने रचली, ज्या ठिकाणी स्वप्ने फुलली, तेथेच स्वप्ने भंगून गेली. अश्रूंची माला सरसर ओघळू लागली. अनंतशास्त्रींची हताश नजर सभोवार पाहू लागली. ती वाडी बहरून उठली होती, ती शेते रसरसून फुलली होती; गौळीवाड्यामधून संपन्न गोकुळाची मुरली घुमत होती; त्या पवित्र आश्रमातून वेदगंगेचा पवित्र घोष ऐकू येत होता; यात्रेकरूंनी धर्मशाळा गजबजून गेल्या होत्या आणि....आणि ते छोटेसे घर....लक्ष्मीच्या मायेची ऊब तेथे विसावा देत होती; तिच्या पावित्र्याचा नंदादीप तेथे सतत प्रकाश देत होता; तिच्या कष्टातून तेथे सौंदर्य निर्माण झाले होते ....तिच्या हौसेची फुले त्या छोट्याशा बगीच्यातून हसत होती.

अनंतशास्त्रींना ही पवित्र आणि दिव्य सृष्टी कर्जदाराना विकावी लागली. बालपणापासून प्रेमाने, मायेने वाढवलेली आपली तरुण सुंदर कन्या दुष्टांच्या हाती पडावी....तशा जहरी वेदना अनंतशास्त्रींच्या हृदयाला घरे पाडू लागल्या !

आता हे सारे सोडून जायचे ! कुठे जायचे ? काय करायचे ? अनंतशास्त्रींच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले.

त्यांनी लक्ष्मीकडे पाहिले. अनिवार दुःखाने तिचे हुंदके उन्मळून येऊ लागले. अनंतशास्त्री व्याकूळ झाले. मुलांकडे पाहिले

त्यांनी. जीवनात हताश झालेली कृष्णा मूकपणे अश्रू ढाळीत उभी होती. लहानगा श्रीनिवास भेदरून जाऊन गप्प बसला होता. आणि सहा महिन्यांची रमा शांतपणे झोपली होती.

अनंतशास्त्री कासावीस होऊन बोलले, "लक्ष्मी संपले. आपल्या जीवनातील एक महान पर्व संपले. हे गुरुकुलाचे स्वप्न भंगले."

"पण आता काय करायचे ?" हताशपणे लक्ष्मीने विचारले.

गंभीरपणे अनंतशास्त्री बोलले, "आता यातून बाहेर पडावे हे बरे ! लक्ष्मी एवढा लाख मोलाचा संसार आपणास सोडावा लागत आहे. मनाला वणवा लागल्याप्रमाणे चटके बसत आहेत. यातना होत आहेत. पण अखेर समाजातील आपल्या हितशत्रूं नी आपणास जिंकले हे खरे ! त्यांच्यापासून दूर दूर गेलेले बरे !"

लक्ष्मी विषण्णतेने म्हणाली, "पण आता कुठे जायचे ? याच ठिकाणी संसार उभारला आपण. येथेच तो वाढवला. येथेच शिक्षण पूर्ण केले. हे सारे सोडून कुठे जायचे ?"

अनंतशास्त्रींनी थोडा वेळ विचार केला, आणि ते निश्चयाने म्हणाले, "खरे आहे सारे हे. पण ज्या ठिकाणी आपण एक दिव्य सृष्टी निर्माण केली तेथेच ती भस्मसात झाली. अशा भकास जागी राहणे शक्य नाही. त्यापेक्षा आताच आपण मुलांना बरोबर घेऊन तीर्थयात्रा करू. आपणाला काय कमी पडेल ? विद्येची संपत्ति शिदोरीला आहे. आणि रक्षणकर्ता तो परमेश्वर आहे. क्षेत्राक्षेत्रातून हिंडू या. मंदिरातून प्रवचने देईन मी आणि तुम्हास सोन्याचे घास भरवीन."



अनंतशास्त्रींच्या कणखर आशावादी मनाने नवीनच वाट दाखवून दिली.

आणि सर्वजण निघाले. अनंतशास्त्रींनी जड अंतःकरणाने पाऊल प्रथम बाहेर काढले, कृष्णा आणि श्रीनिवास हात धरून त्यांच्या मागोमाग चालू लागले. लक्ष्मीने लहानग्या रमेला टोपलीत ठेवले. ती टोपली डोक्यावर घेतली आणि घळघळणाऱ्या अश्रूंना वाट मोकळी करून देत तिने आपले पाऊल वाडीच्या बाहेर टाकले.

गोकुळातील गाईवासरे हंबरू लागली. गुरुकुलातील वेदघोष बंद झाला. पर्णकुटीतील प्रसन्नता कोमेजून गेली. आश्रमाचे पावित्र्य भंगून गेले. त्याला स्मशानी अवकळा आली.

तो गुरुकुल, तो आश्रम, ती वाडी सारी सारी अनंतशास्त्रींची अपत्ये पोरकी झाली. टप्टप् अश्रू गळू लागले.

आणि त्या त्यागी जीवांची तीर्थयात्रा सुरू झाली.

## १३. अभंग श्रद्धा–अभंग श्रद्धास्थाने

अनंतशास्त्री आपल्या कुटुंबासह पुढे पुढे जात होते. सबंध देशातील तीर्थक्षेत्रांकडे जाण्यासाठी पावले पुढे पडत होती. पण मनाची वाटचाल वेगळीच दिसत होती. मागील आयुष्यात उभारलेल्या नव्या श्रद्धास्थानांकडे ते मन पुन्हा पुन्हा धाव घेत होते.

....अनंतशास्त्रींच्या डोळ्यासमोर ती अजाण अशिक्षित लक्ष्मी उभी होती. तिला साक्षात् सरस्वति बनविण्याची ईर्षा मनात उसळत होती. लक्ष्मीच्या रूपात एक आदर्श स्त्रीस्वरूप निर्माण करण्याची श्रद्धा मनात तेवत होती. आणि अखंड परिश्रमाने यशाचा कौल मिळाला. अनंतशास्त्रींना समाजाने दूर लोटले तरी कर्तव्यपूर्ततेचे समाधान मिळाले.

....अनंतशास्त्रींच्या डोळ्यासमोर ते भयाण गंगामूळ अरण्य उभे राहिले. त्या भयानक दंतकथा दात विचकून उभ्या राहिल्या. पण अनंतशास्त्रींच्या जागत्या मनाच्या पहाऱ्यामुळे ती भयानकता संपूर्ण नष्ट झाली व तेथे अमरपुरीचे वैभव डोलू लागले. भारताची सुजलाम् सुफलाम् भूमी या यक्षनगरीत मोठ्या दिमाखाने तळपू लागली. आणि या वैभवसंपन्न नगरीचा हा महान शिल्पकार पुन्हा पुन्हा समाधानाने डोळे पुसू लागला.

...अनंतशास्त्रींना तो समाजाच्या विरोधाचा वणवा दिसू लागला. समाधानाने चमकणारे त्यांचे डोळे निस्तेज दिसू लागले. ती उजाड पडलेली श्रद्धास्थाने पोरकी होऊन त्यांना जणू हाका मारू लागली. आणि आपल्याच शिल्पकृतीचे हे भयाण स्वरूप पाहण्याचे धाडस त्या शिल्पकाराच्या हळुवार मनाला झाले नाही. उन्मळून दाटून येणारा तो हुंदका आतल्या आत दाबत त्या मनाने पाठ फिरविली व ते दूर दूर जाऊ लागले.

....मन जाऊ लागले दूर दूर ! पण जाऊन जाऊन कुठे जाणार ? आजवर सन्मार्गाचीच पाऊलवाट चालत आलेले; ध्येयाची चढण चढलेले ते मन कुठे जाणार ? पायाला हजारो वाटा मिळू शकतात. कधी उतरण, कधी चढण, कधी नदीकाठी, कधी वाळवंटी, कधी मखमली गालिच्यावरून तर कधी खडकाळ जंजाळांतून ! अनंतशास्त्रींच्या सत्त्वशील मनाला असे विविध मार्ग कसे दिसतील ? त्यांना श्रद्धेची अखंड तहान होती. आशेची ऊब होती. आणि त्यामुळेच ती अखंड श्रद्धेची तीर्थक्षेत्रे अनंतशास्त्रींना बोलावू लागली. त्यामुळे त्यांचे मन पुन्हा उमलू लागले.

भारताची भूमी ही श्रद्धेच्या ओलाव्याने सुजलाम् सुफलाम् झालेली ! अनंतशास्त्रींची पावले याच स्थानांकडे जाऊ लागली. तेथेच त्यांच्या मनाला समाधानाचा ठेवा मिळेल असे वाटू लागले........

........ती आली कन्याकुमारी ! येथे तीन प्रचंड महासागर लाटांच्या पावलांनी भारताला प्रणाम करण्यासाठी धावत येत असतात. येथेच रामाने भव्य सेतू उभारून सीतामाईची सुटका

केली. या सागराच्या पाण्यात हे महान साधक उभे राहिले आणि तृप्त तृप्त मनाने त्यांनी नमस्कार केला.

.......ते आले रामेश्वराचे भव्य मंदिर! श्रीरामाच्या महान तेजस्वी जीवनाचे ते भव्य प्रतीक. रामप्रभूंच्या तेजस्वी, ध्येयवादी आणि निरहंकारी जीवनाची ओळख या साधकांना पटली. मनोमन पटली व त्यांचे हात आपोआप जोडले गेले.

....तसेच ते विठ्ठलरखुमाईचे पंढरपूर क्षेत्र! चंद्रभागेच्या त्या वाळवंटात भागवत धर्माची ध्वजा फडकत होती. भक्ति-भावनेचा स्पर्श समाजातील सर्व थराला होत होता. विठ्ठल-भक्तीचा अपूर्व सोहळा रंगत होता. अपूर्व आनंद भरभरून वहात होता. तो दिव्य आनंद अनुभवून या साधकांचे मन विरघळून गेले.

....आणि ती आली मथुरा. कृष्णाच्या भक्तीचे ते वृंदावन. बन्सीधराच्या भक्तीमध्ये रंगून गेलेल्या त्या व्रजनिवासिनी गोपी. कृष्णभक्तीला तेथे महापूर आलेला दिसत होता. गीतेचा महान संदेश सांगणारा तो तत्त्वज्ञ भगवान श्रीकृष्ण तेथे प्रकटत होता. त्याच्या जीवन संदेशामुळे या साधकांच्या क्षीण मनाला पुन्हा सार्थकतेचे बळ आले.

ते आले काशीविश्वेश्वराचे मंदिर. भारतीय श्रद्धेचे उत्तुंग शिखरच! येथे तर या साधकांच्या मनाला स्वर्गप्राप्तीचा आनंद मिळाला.

भारताची ही नानाविध तीर्थस्थाने पहात पहात अनंत-शास्त्री कुटुंबासह हिंडत राहिले. त्यांची श्रद्धेची तहान तृप्त झाली. तरीही ते आपल्या कर्तव्याला चुकले नाहीत.

....ज्या क्षेत्रातून त्यांचा मुक्काम असे तेथे अनंतशास्त्री देवालयात देवासमोर प्रवचने देत. किंवा देवालय नाही मिळाले तर नदीकाठी बसूनही प्रवचने देत. त्यांच्या विद्वत्तेमुळे सर्वजण त्यांच्याकडे आकर्षित होत आणि यातून त्यांना चांगली कमाई होई. लक्ष्मी यातूनच सर्वांचा सांभाळ करी.

अशा हालअपेष्टांमध्ये ते आपल्या धर्माला विसरले नाहीत. मनाच्या हिमतीमुळे व विद्येच्या सामर्थ्यामुळे त्यांना भरपूर पैसा मिळाला. पण तो पैसा आपल्याच गाठी मारला नाही. समाजातील याचकांना बराच मोठा वाटा वाटला जाई व हजारो याचक संतुष्ट होऊन पुढे जात. कष्टमय जीवनात देखील दातृत्वाची वृत्ति नष्ट झाली नाही.

संसारदक्ष लक्ष्मी आपल्या कर्तव्यालाही चुकली नाही. कृष्णा, श्रीनिवास आणि रमा यांचे संगोपन ज्या निष्ठेने ती करी त्याच श्रद्धेने त्यांचे शिक्षणही तिने चालू ठेवले होते. ज्ञानाचे पहिले घास लक्ष्मीने भरवले. गीता, अमरकोश, पुराणे, पुरातन कथा हे सर्व ज्ञान मुलांना दिले. अठरा वर्षे ही यात्रा चालू होती. यातूनच सबंध भारताची पदयात्रा अनेकवेळा घडली. भारतीय समाजाचे विराट दर्शन घडले. कृष्णा, श्रीनिवास आणि रमा या तिघांना ग्रंथविद्येबरोबरच भव्य जीवनदर्शनही घडले. आणि त्यामुळे त्यांच्या बुद्धीचे पैलू प्रकर्षाने चमकू लागले. या तेजाबरोबरच मातापित्यांच्या श्रद्धायुक्त जीवाचा ठसा त्यांच्या मनावर कायमचा कोरला गेला.

अनंतशास्त्री व लक्ष्मी दोघेही विद्यासंपन्न आणि सुसंस्कारी होते. दोघेही अत्यंत कष्टाळू आणि ध्येयासक्त. ईश्वराच्या उपासने-

बरोबरच सामाजिक कर्तव्याची जाणीव दोघांमध्ये कमालीची होती. दोघांची मनोवृत्ती पुण्यवंताची होती. महान तपस्व्यांचे तेज त्यांच्या आचारात आणि विचारात प्रगटत होते.

अशा या विभूतींच्या पोटी जन्माला आलेली ही मुले केवढ्या संपन्न खाणीचे वारसदार होते ! त्यांच्या कृपाछत्राखाली लहानाची मोठी झालेली ही मुले महान संस्कृतीचे वारसदार होते आणि त्यांच्या कष्टमय, यातनामय जीवनाच्या मुशीतून बाहेर पडलेली ही मुले....नव्हे नवरत्नांच्या तेजाला लाजवतील अशी स्वयंप्रकाशी बनली होती. म्हणतात ना........

शुद्ध बीजा पोटी । फळे रसाळ गोमटी !

## १५ आणि ती महायात्रा....!

यात्रा करीत करीत हे कुटुंब मद्रास प्रांतात आले. १८७६ सालचे ते दिवस होते. दुष्काळाचे भीषण थैमान सुरू झाले होते. धान्याचा कणही कोणास मिळेना. यावेळी अनंतशास्त्री आपल्या मंडळींसह व्यंकटगिरी पर्वतावर रहात होते. तिरुपती क्षेत्रात त्यांचा मुक्काम होता. या दुष्काळी दिवसात चोर लुटारूंची धाड वारंवार येई. आणि एके रात्री तर अनंतशास्त्रींजवळची थोडीशी कमाईही या आगीच्या भक्ष्यस्थानी पडली ! आता मात्र अन्न न मिळाल्यामुळे सर्वांचे हाल सुरू झाले.

अनंतशास्त्री फारच वृद्ध झाले होते. लक्ष्मीही फार थकली होती. दोघांना भुकेचा दाह सहन होईना. केवढे दुर्दैव हे ! गंगामूळ अरण्यातील गुरुकुलामध्ये रोज शेकडो यात्रेकरूंना अन्नदान करून संतुष्ट करणारे हे दाते अनंतशास्त्री लक्ष्मी—

आता अन्नावांचून अक्षरश: तडफडू लागले. अशा अवस्थेमध्ये निदान पैसा तरी उपयोगाला आला असता. पण तोहि संपला होता. सबंध आयुष्यभर ज्यांनी आपल्या जवळची लक्ष्मी दान करण्यातच खर्च केली आणि हजारो जीवांचे ज्यांनी आशीर्वाद मिळवले, तेच हे अनंतशास्त्री आपल्या म्हातारपणी अन्नासाठी कासावीस झाले !

रमेला व श्रीनिवासला आपल्या मातापितरांचे आणि बहिणीचे हाल पहावेनात. त्या दोघांनी जंगलातून खजुरीच्या बिया आणल्या व या बियावर सर्वांनी कसेबसे अकरा दिवस काढले. पण आता अनंतशास्त्रींना ही उपासमार मुळीच सहन होईना. त्यांचा अक्षरश: लोळागोळा झाला. त्यांची दृष्टीही नाहिशी झाली.

तरीही त्यांचे मन जिवंत होते. ज्या समाजामध्ये बहिष्कृत अवस्थेत देखील ज्यांनी अत्यंत स्वाभिमानाने जिणे काढले तेथे अशा लाचारीने जिवंत राहणे त्यांच्या मानी मनाला कसे पटावे ?

तिरुपती क्षेत्राचे ते भव्य तळे अंधुक धूसर असे त्यांना दिसत होते आणि त्यांनी असा निर्णय घेतला की या तळ्यात एका मागोमाग एक असे सर्वांनी जलसमाधी घ्यावी.

अनंतशास्त्रींनी प्रथम जलसमाधी घेण्याचा स्वत:चा निर्णय घेतला. मनाच्या आणि शरीराच्या त्या विकल अशा अवस्थेत त्यांच्या तोंडून शब्द फुटेना ! अंध डोळयांनीच ते सर्वांचा निरोप घेऊ लागले. मनाचा कोलाहल त्यांच्या डोळ्यातून वहात होता.

" ही लक्ष्मी....नऊ वर्षाची कोवळी पोर होती. तेव्हा-पासून आजपर्यंत मला तिने साथ दिली. माझ्या सर्व महत्वाकांक्षा

पूर्ण केल्या. माझ्या संकल्पांना भरघोस फळे आणली. माझ्या सुखदु:खात सतत बरोबर राहिली. आणि इतक्या कष्टातून, हालअपेष्टातून देखील सतत प्रसन्न, समाधानी राहिली....हिला मी सोडून जाणार !!"

"ही माझी कृष्णा....बुद्धिमान पोर....पण नशिबाने फासा उलटा टाकला.......बिचारी जन्मभर तडफडत राहिली......."

"हा श्रीनिवास....माझ्या विद्येचा वारसदार....माझा एकुलता एक आधार....ही माझी रमा...."

आणि रमेकडे वळताच अनंतशास्त्री कळवळले. त्यांनी रमेला पोटाशी धरले व ते रडू लागले ओक्साबोक्सी ! अडखळत कळवळत ते बोलू लागले,...."बाळा, जातो मी. तूं सर्वात धाकटी. माझी सर्वात आवडती ! तुम्हाला सर्वांना....सोडून....जातो. बाबांनो जी विद्येची कमाई होती....ती सर्वांना दिली. नित्य.... सदाचरणाने वागा....समाजाचा....उद्धार....करा. ईश्वरावर अढळ श्रद्धा ठेवा...."

प्रसंग मोठा दारुण ! कोणालाच सोसवेना !! लक्ष्मी तर कोसळून पडली. रमा, कृष्णा ढसढसा रडूं लागल्या. श्रीनिवास स्तब्ध होता. त्याला काहीच सुचेना. अनंतशास्त्री सर्वांचा निरोप घेऊन जाण्यासाठी उठू लागले. पण श्रीनिवासाने त्यांना हात धरून झोपवले व तो म्हणाला, "बाबा, जलसमाधीचा विचार सोडून द्या. मी एवढा कर्ता मुलगा असताना आत्महत्या कशासाठी करता ? चला, आपण सर्वजण पर्वतावरून उतरून खाली जाऊ. खेड्यात राहू. मी कामधंदा करून पोटाला मिळवीन. एक भाकरी मिळाली तरी सर्वजण मिळून खाऊ. चला."

अनंतशास्त्रींचे विकल डोळे किंचित् चमकले. ते थोडेसे हसले. लक्ष्मीला धीर वाटू लागला. श्रीनिवासने अनंतशास्त्रींना आपल्या खांद्यावर घेतले. लक्ष्मीने रमेचा व कृष्णेचा हात धरला. आणि सर्वजण हळुहळू पर्वत उतरू लागले. भुकेने व्याकूळ होऊन रखडत रखडत जाऊ लागले.

पर्वतावरून उतरले व कसेबसे चालत चालत एका पडक्या देवळापाशी आले. पण पुजाऱ्याने त्यांना ओळखले नाही. त्याला वाटले कोणी भिकारीच असावेत ! आणि त्याने सर्वांना हाकून लावले. एके काळचे तेज:पुंज विद्यासंपन्न आणि धनवान ब्राह्मण अनंतशास्त्री एखाद्या दीनदुबळया लुल्यापांगळया भिकाऱ्यासारखे दिसत होते. श्रीनिवासने नि:श्वास टाकून अनंतशास्त्रींना उचलून पाठुंगळी घेतले व सर्वजण धर्मशाळेची वाट चालू लागले. लक्ष्मी रमेच्या आधाराने रेटत रेटत जाऊ लागली. अखेर सर्वांनी धर्मशाळा गाठली.

ह्या हालअपेष्टा, हे अपमान ! अनंतशास्त्रींच्या जिवाला सोसेनात. त्यांचे शरीर भुकेमुळे व्याकूळ झाले होतेच. पण मनही या अपमानामुळे व उपेक्षेमुळे तडफडू लागले. आणि येथेच अनंतशास्त्रींचा जीव कासावीस होऊ लागला. लक्ष्मी व्याकूळ होऊन घाबरून गेली. धाय मोकलून रडू लागली.....रमा.... कृष्णाही रडू लागल्या. श्रीनिवास डोळे पुसू लागला....

अनंतशास्त्रींच्या घशाला कोरड पडली. त्यांनी कसेबसे साखरपाणी मागितले. दुष्काळात साखर कोठून मिळणार ? रमा, श्रीनिवास धावले. पण साखर मिळाली नाही. शेवटी नुसतेच पाणी घातले गेले आणि अनंतशास्त्रींनी अखेरचा श्वास सोडला.

विचारी लक्ष्मी बेशुद्धच पडली! सर्वांच्या दु:खाला पारावार राहिला नाही. पण श्रीनिवासला दु:ख आवरून पुढील व्यवस्था पाहणे आवश्यक होते. मृत पित्याला वाहून नेण्यासाठी श्रीनिवासने इकडे तिकडे चौकशी केली. पण कोणीही मदतीसाठी पुढे येईना. शेवटी श्रीनिवासने पित्याचे प्रेत धोतरात गुंडाळून पाठीवर घेतले, स्मशानात नेले व पुढील क्रियाकर्म पार पाडले.

समाजाचा एक अज्ञात तपस्वी जगाच्या निष्ठुरतेपासून दूर गेला.

अनंतशास्त्रींच्या पाठोपाठ लक्ष्मीने व कृष्णेने देखील अंथरूण घातले. लक्ष्मी निर्वाणीची भाषा बोलू लागली....भुकेमुळे ती जास्तच व्याकूळ होऊ लागली. श्रीनिवासला व रमेला काहीच सुचेना.

एके दिवशी लक्ष्मीने रमेजवळ भाकरी मागितली. पण जवळ भाकरी नव्हती. रमा गावात हिंडू लागली. पण भाकरी कशी मागावी ते तिला समजेना. शेवटी एका घरासमोर उभी राहून रमा रडू लागली. त्या घरच्या बाईने जाणून तिला भाकर दिली. भाकर मिळताच मोठ्या आनंदाने धावत धावत रमा आईपाशी आली व म्हणाली, " आई....आई....भाकरी घे घे!" पण आई कुठे शुद्धीवर होती? भाकरी तशीच पडून राहिली व लक्ष्मीच्या तोंडामध्ये पाण्याचा नुसता थेंबच गेला. लक्ष्मीने जगाचा निरोप घेतला.

लक्ष्मीला वाहून नेण्यास कशीबशी दोन माणसे आली. श्रीनिवासने एक खांदा दिला व चौथा खांदा स्वत: रमेने दिला आणि पुढील क्रियाकर्म पार पडले. कृष्णाही आईच्या मागोमाग निघून गेली.

अशी आहे अनंतशास्त्री व लक्ष्मी यांची करुण कहाणी ! जेवढी गंभीर तेवढीच पवित्र !

## १५. विश्वकर्म्यांची दुर्दैवी बाळे !

विश्वकर्मा म्हणजे मूर्तिमंत नवनिर्माण-शक्ती. त्यांची बुद्धी नवी सृष्टी रचत असते. त्याची कल्पनाशक्ती नव्या जडणघडणीचे प्रयोग करीत असते. त्याची योजकता नव्या रचनेचे कार्य करीत असते. ही नवसृष्टि हेच या विश्वकर्म्याचे नंदनवन. येथेच त्याचा आनंद प्रकर्षाने उसळत असतो. समाधान अखंडपणे तेवत असते.

अनंतशास्त्री व लक्ष्मी म्हणजे याच विश्वकर्म्याची दुर्दैवी बाळे असावीत. आपल्या पित्याप्रमाणेच नवसृष्टिरचनेत दंग !

अनंतशास्त्रींनी पाहिले भारतीय स्त्रीकडे ! तिला हिणकस ठरवून डबक्यात फेकून दिलेले होते. त्यांनी तिला उचलले, साफसूफ केली. तिच्यामध्ये गुप्त रूपांत असलेले अनेक सद्गुण त्यांना दिसले. त्यांनी आपला नवनिर्मितीच्या शक्तीचा हात तिच्यांवरून फिरविला. तिला लक्ष्मी सरस्वतीचाच....अवतार बनवले.

आणि विश्वकर्मा संतोषला.

हा लक्ष्मीचा नवा अवतार पुढे सरसावला. अनंतशास्त्रींच्या हाताला हात लावून नवसृष्टि रचू लागला. नवरचनेच्या कामाला गती मिळाली आणि जंगलामध्ये मांगल्याचा स्वर्ग निर्माण झाला.

विश्वकर्मा समाधानाने हसला.

पण दुर्दैव जळफळू लागले. त्याने समाजामध्ये विरोधाचा वणवा पेटावला आणि ही नवसृष्टि जळून खाक झाली.

विश्वकर्म्याच्या डोळ्यातून आसू वाहू लागले !

पण त्याची ही लेकरे हटली नाहीत. घराच्या प्रेमळ वातावरणात मुलांची जडणघडण नव्या कलाकुसरीने करू लागले. संसाराच्या मंदिरामध्ये उत्कृष्ट शिल्पकृती तयार झाल्या.

विश्वकर्म्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकू लागले.

पण हाय ! याच वेळी दुर्दैवाने दुष्काळाचा ज्वालामुखी उघडविला आणि विश्वकर्माच्या या बाळांची त्यामध्ये आहुती पडली.

ही आहुती वाया गेली नाही. यातून एक नवे तेज निर्माण झाले. ते म्हणजे अनंतशास्त्रींची धाकटी कन्या रमा.

ह्याच रमेला आज पंडिता रमाबाई असे भारत म्हणू लागला. हीच भारताची एक तेजस्विनी !

समाप्त

ग्रा. क्र. 18833

REFBK-0014433